POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३३८ ● मुंबई, बुधवार, ०९ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मनसेचं पुन्हा खळखट्ट्याक? मोर्चाला परवानगी नाकारली

### कलम १४४ लागू, वातावरण तापलं, मनसे संतप्त, प्रचंड संख्येने पोलीस रस्त्यावर

**■मुंबई। प्रतिनिधीः**

मुंबईत पुन्हा एकदा मराठी-अमराठीचा मुद्दा जोरदार तापला आहे. मीरा भाईंदरमध्ये एका अमराठी व्यापाऱ्याच्या कानशिलात लगावल्यानंतर व्यापाऱ्यांनी मोर्चा काढून मीरा भाईंदर बंद पुकारला. मात्र, मनसेनेही उत्तर म्हणून मोर्चा काढण्याचा निर्णय जाहीर केला. पण पोलिसांनी या मोचार्ला परवानगी नाकारली. एवढंच नव्हे तर पोलिसांनी मनसे नेत्यांची मध्यरात्री धरपकड करून त्यांना ताब्यात घेतलं. त्यामुळे मनसे कार्यकर्ते आणि सामान्य लोक संतापले असून रस्त्यावर उतरले आहेत. मनसे कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून निषेध करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे मनसे पुन्हा एकदा खळखट्ट्याक मोडवर जात असल्याचं चिन्ह दिसत आहे. तर दुसरीकडे मीरा भाईंदरमध्ये पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात असून आंदोलनकर्त्यांना अडवलं जात आहे. त्यामुळे मीरा भाईंदरमधील वातावरण चांगलंच तापलं आहे.





**मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख पोलिसांच्या ताब्यात**

मिरा रोड प्रकरणी मनसेचे नेते संदीप देशपांडे 11 वाजता राज ठाकरेंची शिवतीर्थ येथे भेट घेणार आहेत. आणि या विषयावर चर्चा करतील. मिरा रोड पोलिसांकडून सुरू असलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर मुंबई ठाण्यातील मनसेचे पदाधिकारी मिरा रोड येथे पोहोचत आहेत. दरम्यानमराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख हे आंदोलन स्थळी पोहोचण्या अगोदरच त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

**मराठी माणसालाच विरोध का?**

मराठीच्या मुद्द्यासाठी जमलेल्या लोकांची पोलिसांकडून धरपकड सुरु आहे. तसेच आंदोलन करणाऱ्या अनेक महिलांनांही ताब्यात घेण्यात आलं असून पोलिस त्यांना जबरदस्तीने व्हॅनमध्ये बसवत आहे. व्यापाऱ्यांच्या मोचार्वेळी कायदा का नाही? अमराठी लोकांच्या मोचार्ला परवानगी दिली मग आम्हाला का नाही? सरकारची मराठी माणसावरच कारवाई का? असे अनेक सवाल येथे जमलेल्या लोकांकडून उपस्थित केले जात आहेत. मराठी एकजुटीचा विजय असो, महाराष्ट्र सरकार हाय हाय अशा घोषणा दिल्या जात असून वातावरण पूर्णपणे तापलेलं आहे.

**या सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का?**

महाराष्ट्रात राहूनही मराठी माणसावरच अन्याय होत आहे. पोलिसांनी पूर्णपणे दडपशाही केली आहे, मला असं वाटतंय की मी गुजरातमध्ये येऊन मोर्चा काढतोय. अरे मराठी माणसाने महाराष्ट्रात नाही तर गुजरातमध्ये जाऊन मोर्चा काढायचा का? या सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का? पोलिसांनी धरपकड केलेल्या मनसेच्या अनेक कार्यकर्त्यांनी, आंदोलकांनी आणि सामान्य लोकांनी हा प्रश्न उपस्थित करत सरकारवर टीकास्त्र डागलं आहे. आम्ही सामान्य व्यक्ती आहोत. आम्ही कोणत्याही जाती-धर्माविरोधात बोलत नाहीयोत, कोणाबद्दलही आम्हाला आक्षेप नाही, पण मग फक्त मराठीलाच विरोध का असा सवाल एका महिलेने विचारला. जेव्हा गुजराती, मारवाडी लोक रस्त्यावर उतरले, जय गुजरात म्हणाले तेव्हा सर्व बहिरे झाले होते का असा रोखठोक सवालही त्यांनी उपस्थित केला.

**ही कसली लोकशाही?**

"मी मराठी भाषा आणि मराठी माणसासाठी बोलले म्हणून माझी धरपकड मुंबई पोलिस करत आहे. ही कसली लोकशाही?" असा सवाल पोलिसांनी पकडलेल्या एका महिलेने केला आहे. मीरा भाईंदरमध्ये मनसेच्या कार्यकर्त्यांसह अनेक सर्वसामान्य लोकही माय मराठीसाठी रस्त्यावर उतरले आहेत. अनेक महिलांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.



**गो बॅक... गो बॅक... प्रताप सरनाईक गो बॅक...**
**शिंदेंच्या मंत्र्याविरोधात जनआक्रोश... मनसेचा मोर्चा चिघळला**

पोलिसांनी परवानगी नाकारली. मनसे कार्यकर्त्यांच अटक सत्र सुरु होतं. पण हळूहळू जनमताचा रेटा वाढत गेला. मनसे मोर्चावर ठाम राहिली. अखेर पोलिसांना मोचार्ला परवानगी द्यावी लागली. या मोर्चामध्ये प्रचंड संख्येने लोक सामील झाले होते. यावेळी शिवसेनेचे नेते आणि राज्य सरकारमधील मंत्री प्रताप सरनाईक सुद्धा मोर्चात सहभागी झाले होते. पण त्यांना तिथे नकारात्मक प्रतिसाद मिळाला. प्रताप सरनाईक मोर्चाच्या ठिकाणी येताच जय गुजरातच्या घोषणा देण्यात आल्या. गो बॅक... गो बॅक... प्रताप सरनाईक गो बॅक... अशी सुद्धा घोषणाबाजी जाली. "मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघाला होता. त्यांना पोलीस स्टेशनमध्ये सोडवण्यासाठी मी आलो होतो. मराठी बांधवांना आणि मीरा-भाईंदरमधील मराठी बांधवांना पाठिंबा देण्यासाठी मी इथे आलो होतो" असं प्रताप सरनाईक यांनी सांगितलं.

**बाकीच्यांना जे काय राजकारण करायचय ते करुं दे**

पत्रकारांनी त्यांना विचारलं, तुम्ही आल्यावर जय गुजरातच्या घोषणा दिल्या. त्यावर प्रताप सरनाईक म्हणाले की, "राजकारण राजकारणाच्या ठिकाणी आहे. माज्यासोबत मराठी एकीकरण समितीचे गोवर्धन देशमुख आहेत. त्यामुळे बाकीच्यांना जे काय राजकारण करायचय ते करुं दे. प्रताप सरनाईक मीरा-भाईंदरमधील मराठी जनांच्या पाठिमागे ठामपणे उभा आहे"

## राज ठाकरे यांच्याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतला मोठा निर्णय

**■मुंबई। प्रतिनिधीः**

२० वर्षानंतर ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. महाराष्ट्रात पुन्हा ठाकरे पर्वाला सुरूवात झाली आहे. ५ जुलै २०२५ रोजी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले. मराठीच्या मुद्यावर दोन्ही ठाकरे एकत्र आले आहेत. मात्र, भाजपसह शिंदेच्या शिवसनेचे नेते ठाकरेंवर टीका करत आहेत. अशातच आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याबाबत मोठा निर्णय घेतला आहे.

राज ठाकरे यांच्यावर किंवा यांच्या विरोधात बोलण्याचा विषय काय येतो. ना कुठला पक्ष, ना कुठला झेंडा अशी त्यांची भूमिका राज ठाकरे यांची होती. मात्र, उद्धव ठाकरे यांनी हिंदी सक्ती, मराठी भाषा सोडून खालच्या पातळीची टीका त्या मेळाव्यात केली. मुंबई महापालिका निवडणूक, आणि पालिकेची तिजोरी डोळ्यासमोर ठेऊन त्यांनी भाषण केल. उद्धव ठाकरे हे हारलेले दिसून आले. राज ठाकरे आमच्याबद्दल काही बोलले नाहीत म्हणून आम्ही त्यांच्याबद्दल काही बोलणार नाही असं शिवसेना खासदार नरेश मस्के म्हणाले.



माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलारांनी ठाकरेंच्या विजयी मेळाव्यावर टीका केलीय. एकाचं भाषण अपूर्ण होतं, तर दुस-याचं भाषण अप्रासंगिक होतं. असा टोला शेलारांनी ठाकरे बंधूंना लगावला. यावर मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी प्रत्युत्तर दिलंय. संपूर्ण भारतात शेलार एक नंबरचे वक्ते असल्याचा टोला त्यांनी लगावला. शिंदेच्या शिवसेनेचे नेतेही ठाकरेंवर टीका करत आहेत. यानंतर आता एकनाथ शिंदे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याबाबत मोठा निर्णय घेतला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात न बोलण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे त्यांच्या पक्षातील प्रवक्तांना आणि नेत्यांना दिले आहेत. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या विजय मेळाव्यानंतर राज ठाकरे यांच्या विरोधात आणि मेळाव्या विरोधात कोणत्याही प्रकारची टीका न करण्याच्या सूचना एकनाथ शिंदे यांनी केल्या आहेत.

उद्धव ठाकरे यांच्याबद्दल आम्ही सतत बोलू. उद्धव ठाकरे यांनी अतिशय गलिच्छ पद्धतीने भाषण करुन उसण अवसान आणलं, अश्लील भाषण करण्याचा प्रयत्न केला. पालिका निवडणुका तिजोरी डोळ्यासमोर ठेऊन भाषण केले. महाराष्ट्र, मराठी माणसांवर अन्याय असं भडकावून निवडणुका लढवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. मराठी माणसांना भडकावून त्यांची मत मिळवणे हाच त्यांचा उद्देश होता असी टीका नरेश मस्के यांनी केली.

## महाराष्ट्रत पुढील ५ दिवस मुसळधार पावसाचा अंदाज

**■मुंबई। प्रतिनिधीः**





राज्यात यंदा मान्सून वेळआधी दाखल झाला. मे महिन्यात मान्सूनपूर्व मुसळधार पाऊस झाला होता. त्यानंतर जून महिन्यात काही दिवस पावसाने ओढ घेतली होती. परंतु जुलै महिन्याच्या सुरुवातीपासून राज्यात सर्वत्र पावसाने जोर धरला आहे. आता आगामी पाच दिवस पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. यामुळे महाराष्ट्रात पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रात १३ जुलैपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेने व्यक्त केला आहे. तसेच मराठवाडा आणि विदर्भात ९ जुलैनंतर पावसाचा जोर असणार आहे. त्यानंतर पाऊस कमी होणार आहे. यंदा राज्यात मराठवाडा आणि विदर्भ वगळता सर्वत्र पावसाने सरासरी गाठली आहे. कोकणात ७ जुलैपर्यंत १०३ टक्के पाऊस झाला आहे. नाशिकमध्ये १०२ तर पुण्यात १०१ टक्के पाऊस झाला आहे. नागपूर आणि छत्रपती संभाजीनगरात पावसाची तूट आहे. नागपूरमध्ये सरासरीच्या ८४ टक्के तर छत्रपती संभाजीनगरमध्ये सरासरीच्या ७६ टक्के पाऊस झाला आहे.

## राज्यात लवकरच निवडणुकांचे धुमशान

### निवडणूक आयोगाने बोलावली जिल्हाधिकाऱ्यांची बैठक, कार्यकर्ते लागले कामाला

**स्थानिक स्वराज्य संस्थांचा बिगूल वाजला**

येत्या काही काळात राज्यातील ३२ जिल्हा परिषदा, ३३६ पंचायत समित्या, २४८ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायती आणि २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका होतील. त्याची प्रशासकीय स्तरावर जय्यत तयारी सुरू आहे. या निवडणुकीच्या पूर्वतयारीचा विभागनिहाय आढावा १० जुलै रोजी घेण्यात येणार आहे. पण या बैठकीत महानगरपालिकेच्या निवडणुकीचा आढावा नसेल. राज्य निवडणूक आयुक्त व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आढावा घेतील. त्याविषयीचे परिपत्रक निवडणूक आयोगाने काढले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात राज्यात निवडणुकांचा धडाका सुरू होईल, असे चित्र आहे.

**■बीड। प्रतिनिधी :**

राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे धुमशान होत आहे. गेल्या पाच वर्षांपासून स्थानिक पुढाऱ्यांना वनवास होता. अनेक पालिकांवर प्रशासन राज आले होते. त्यांचा वनवास आता संपेल. कार्यकर्त्यांना जल्लोष करता येणार आहे. आरे आवाज कुणाचा हा नारा पुन्हा घुमणार आहे. राजकीय पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कवायत सुरू केली असतानाच आता राज्य निवडणूक आयोगाने सुद्धा तयारी सुरू केली आहे. काय आहे अपडेट?

**जिल्हाधिकाऱ्यांची लवकरच बैठक**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांची लगबग सुरू झाली आहे. मराठीच्या मुद्दा तापवून मुंबई, ठाणे महापालिकेसह इतर पालिकेच्या निवडणुकीची गोळाबेरीज सुरू झाली आहे. तर दुसरीकडे मिनी मंत्रालयाच्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीचे वारू सुद्धा उधळणार आहे. त्यामुळे या वर्षाच्या अखेरीस अथवा पुढील वर्षाच्या सुरुवातीला राज्यात विविध निवडणुकांचे धुमशान पाहायला मिळले.



राज्य निवडणूक आयोगाने त्यासाठी पावलं टाकली आहेत. आयोगाने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. त्या बैठकीसाठीचे पत्र जिल्हाधिकाऱ्यांना पाठवण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीसाठी ही बैठक बोलावण्यात आल्याचे समजते. १० जुलै रोजी ही बैठक होईल. व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकारी त्याला उपस्थित असतील. गुरुवारी दुपारी १२ वाजता ही बैठक होईल. त्याविषयीचे परिपत्रक निवडणूक आयोगाने काढले आहे. राज्य निवडणूक आयोगाचे उपायुक्त राजेंद्र पाटील यांनी बैठकीबाबतचे पत्र राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना पाठवले आहे.

## मराठवाड्यात शेतकरी आत्महत्या २० टक्क्यांनी वाढल्या

### पहिल्या सहामाहीत किती मृत्यू, धक्कादायक आकडेवारी

**■बीड। प्रतिनिधी :**



राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत असल्याचं वास्तव सरकारने नुकतंच विधान परिषदेत मांडलेल्या आकडेवारीतून स्पष्ट केलंय. या वर्षी जानेवारी ते मार्च २०२५ या अवघ्या ३ महिन्यांच्या कालावधीत राज्यात तब्बल ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिली आहे. विरोधी पक्षाच्या आमदारांनी वाढत्या शेतकरी आत्महत्यांबद्दल प्रश्न उपस्थित केल्यानंतर राज्याचे मदत आणि पुनर्वसन विभागाचे मंत्री मकरंद पाटील यांनी विधान परिषदेत त्यांच्या लेखी उत्तरात ही आकडेवारी सादर केली.

राज्य महसूल विभागाच्या अहवालानुसार, २०२५ च्या पहिल्या सहामाहीत (१ जानेवारी ते २६ जून) तब्बल ५२० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद झाली आहे. ही संख्या २०२४ मधील याच कालावधीतील ४३० आत्महत्यांपेक्षा २० टक्क्यांनी जास्त आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी पीकविम्याची प्रतिक्षा, कधी बाजारभावाची अनिश्चितता अशा हे संकटांच्या साखळीत अडकलेले शेतकरी शेवटी आयुष्यच संपवतात.

मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी बीड जिल्हा सर्वाधिक आत्महत्या नोंदवलेल्या जिल्ह्यांच्या यादीत पुन्हा पहिल्या क्रमांकावर आहे. जानेवारी ते जून २०२५ दरम्यान बीडमध्ये तब्बल १२६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, तर मागील वर्षी याच कालावधीत ही संख्या १०१ होती. तर मराठवाड्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये जानेवारी ते जून २०२५ दरम्यान, छत्रपती संभाजीनगर - ९२, नांदेड - ७४, परभणी - ६४, धाराशिव - ६३, लातूर - ३८, जालना - ३२, हिंगोली - ३१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.

पीक नुकसान, राष्ट्रीयीकृत आणि सहकारी बँकांकडून किंवा परवानाधारक सावकारांकडून कर्ज फेडण्यास असमर्थता, वाढत्या कर्जामुळे झालेल्या शेतकरी आत्महत्या आर्थिक मदतीसाठी पात्र मानल्या जातात. अशा शेतकऱ्यांच्या नातेवाईकांना १ लाख रुपये दिले जातात. राज्यभरात आम्हत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या ३७३ कुटुंबे आर्थिक भरपाईसाठी पात्र असल्याचे आढळून आले. तर २०० कुटुंबांना अपात्र घोषित करण्यात आले, असे राज्याचे मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी विधान परिषदेत शेतकरी आत्महत्यांबाबत विचारलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात सांगितले.



## 'मी आत्महत्या करीन... तुझ्या आई-वडिलांनाही मारीन' धमकी देत विनयभंग

**■नागपूर। प्रतिनिधी :**

बीडमधील गुन्हेगारीच्या घटना थांबायला तयार नाहीत. आता केज तालुक्यातील एका गावात 9 वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. या घटनेतील आरोपी तरुण निखिल कांबळेने पीडित तरुणीचा पाठलाग करत तिला, ह्यतू माज्याशी बोलली नाहीस तर मी आत्महत्या करीन, तुज्या आई-वडिलांनाही मारीन, अशी धमकी देत विनयभंग केला. त्यानंतर आता निखिल कांबळेवर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, या अल्पवयीन शाळकरी मुलीचा मागील १५ दिवसांपासून आरोपी तरुणाकडून दुचाकीवरून पाठलाग सुरू होता. मुलीकडून उत्तर न मिळाल्याने निखिल कांबळेने 4 जुलै रोजी मुलीला धमकी दिली. यानंतर मुलीच्या घरचे त्याला जाब विचारण्यासाठी गेले असता, त्याने एका महिलेला देखील त्याने मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे आता केज पोलीस ठाण्यात त्याच्याविरोध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या आठ दिवसातील केज पोलीस ठाणे हद्दीतील महिला अत्याचाराची ही तिसरी घटना आहे. वाल्मीक कराडचा समर्थक असलेल्या नानासाहेब चौरेने गतिमंद मुलीवर बलात्कार केला होता. तर बाळू कांबळेने गतिमंद तरुणीचा विनयभंग केला होता. यानंतर आता बाळू कांबळेचा मुलगा निखिल कांबळेने शाळकरी मुलीचा विनयभंग केल्याचे समोर आले आहे.

धक्कादायक म्हणजे विनयभंग प्रकरणातील आरोपी निखिल कांबळेचे वडील बाळासाहेब कांबळे याच्या विरोधात देखील २ दिवसांपूर्वी एका गतिमंद तरुणीच्या विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला होता. आता मुलावरही गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे आरोपींना पोलिसांचा धाक उरला नसल्याचे समोर आले आहे.

### प्रॅक्टिससाठी थांबवून ती हॉटेलमध्ये रुम बुक करायची अन् मग...

सोशल मीडियावर एका चेअर लिडरने महिला कोचबद्दल धक्कादायक दावा केला आहे. या चेअर लिडरने असा आरोप केला की, तिची महिला कोच तिला वेगवेगळ्या हॉटेलमधील रुममध्ये घेऊन जाते आणि अत्याचार करते. ही धक्कादायक घटना चेअर लिडर १३ वर्षांची असताना सहन करावी लागली होती. निया असं या चेअर लिडरचं नाव असून ती १३ वर्षांची असताना चीयरलीडिंग ग्रुपमध्ये जाईन झाली. नियाला लहानपणापासून खेळ आणि जिमनास्टिक आवडायचं. त्यामुळे आपल्याला चीयरलीडिंग टीममध्ये प्रवेश मिळाला हे कळल्यावर तिचा आनंद गगनात मावत नव्हता. पण या आनंदावर लवकरच विरजन लागलं. तिची महिला कोच ज्यावेळी म्हणाली की, तुला मी चांगलं शिकवेल तर रोज सकाळी लवकर आणि संध्याकाळी उशिरापर्यंत थांब. तिला आनंद झाला आणि लगेचच होकार दिला.

पण तिचा हा उत्साह आणि शिकण्याची जिद्द तिच्या आयुष्यात भयानक वादळ घेऊन आली. तिची महिला कोच वेगवेगळ्या हॉटेलमध्ये वेगळ्या नावाने रुम बूक करायची आणि त्या १३ वर्षीय नियावर यौन शोषण करायची.

नियाने सांगितलं की, महिला कोच सुरुवातीला प्रॅक्टिसबद्दल गप्पा मारायची पण काही महिन्यांतर तिने नियाचा शोषण करण्यास सुरुवात केली. एवढंच नाही तर अवान तिला म्हणाली हे सर्व सामान्य आहे. पण काही महिन्यांनी ती कपड्यांखाली स्पर्श करायला लागली. स्पर्धेसाठी बाहेर गावी गेल्यावर हॉटेलमध्ये महिला कोच तिच्यासाठी वेगळ्या नावाने रुम बूक करायची पण तिला स्वतःच्या जवळ झोपवायची. निया घाबरली होती कारण तिला ग्रुपमध्येही चांगलं स्थान मिळालं होतं. जर ही गोष्ट कोणाला कळली तर गैरसमज होईल आणि तिची अडचण वाढेल. त्यानंतर तिने सर्व काही डायरीत लिहायला सुरुवात केली. हीच डायरी २०१३ मध्ये पालकांच्या हाती लागली आणि त्यांना धक्काच बसला.

निया डूरंट आज २७ वर्षांची असून तिने हे वेदनादायी कहाणी सोशल मीडियावर सांगितली आहे. २०१० मध्ये नियासोबत हा अत्याचार सुरु झाला आणि २०१३ मध्ये हे सत्य समोर आलं खरं पण तिने पोलिसांनी याबद्दल काही सांगितलं नाही. त्यानंतर २०१७ मध्ये ती युनिव्हर्सिटीमध्ये शिकत असताना तिला जाणव झाली की, आपण जर आताही आवाज उठवला नाही, तर दुसऱ्या मुलींना त्या महिला कोचकडून अशाच त्रास होत राहिल. त्यामुळे तिने हिम्मत करत २०१८ मध्ये पोलिसांनी तिच्यासोबत झालेल्या यौन शौषणबद्दल तक्रार केली. यानंतर पोलिसांनी कारवाई करत महिला कोच अवनला अटक करण्यात आली. मग २०२० मध्ये अवनवर पाच यौन शोषणाच्या आरोपांची सिद्ध झाले. यानंतर ऑक्टोबर २०२४ मध्ये तिला १० वर्षांची शिक्षा झाली.





## आमदार सुरेश धस यांच्या मुलाच्या कारच्या धडकेत बाईक स्वाराचा मृत्यू



भाजप आमदार सुरेश धस यांच्या मुलाच्या कारच्या धडकेत बाईक स्वाराचा मृत्यू झाला आहे. अहिल्यानगर- पुणे महामार्गावर हा भीषण अपघात झाला आहे.

**■सातारा। प्रतिनिधी :**

अहिल्यानगर-पुणे महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. भाजप सुरेश धस यांच्या मुलाच्या कारच्या धडकेत बाईक स्वाराच्या मृत्यू झाला आहे. या अपघातामुळे एकच खळबळ उडाली आहे. अपघात नेमका कसा झाला याचा पोलिस तपास करत आहेत. या अपघातात कारची अवस्था खूपच भयानक झाली आहे. नितीन शेळके असे अपघातात मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. आष्टी विधानसभा मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांचा मुलगा सागर सुरेश धस याच्या चारचाकी वाहनाने या दुचाकीस्वाराला धडक दिली. काल रात्री साडेदहा ते अकराच्या दरम्यान अहिल्यानगर- पुणे महामार्गावर हा अपघात घडला आहे. या प्रकरणी सुपा पोलीस स्टेशनमध्ये अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात करण्यात आला आहे. दुचाकीस्वार हा जातेगाव फाट्याकडून रास्ता ओलांडत असतांना सागर धस याच्या वाहनाने जोराची धडक यात या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# पहिल्या आठवड्याचे फलित काय?

शेतकऱ्यांचे प्रश्न, शक्तिपीठ महामार्गाला विरोध अशा विविध मुद्द्यांवर आवाज उठवत अधिवेशनाला सुरुवात झाली. या गदारोळात सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांचे काय? अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्याचे फलित जनतेला काय मिळाले? याचा विचार होणे गरजेचे आहे. दर्जेदार आरोग्य सुविधा, खड्डेमुक्त रस्ते, मुबलक पाणी, कचरामुक्त राज्य याच सर्वसामान्य जनतेच्या माफक अपेक्षा. आपल्या मतदारसंघातील समस्यांचे निवारण, पायाभूत सुविधा मिळणे यासाठी मोठ्या विश्वासाने मतदारराजा लोकप्रतिनिधींना निवडून विधानसभेत पाठवतो. जनतेच्या प्रश्नांवर वेळोवेळी बैठका, चर्चा होते. जनतेच्या प्रश्नांवरून लोकप्रतिनिधी सरकारी यंत्रणेवर बरसतात; मात्र जनतेचे 'प्रश्न जैसे थे' राहतात. जनतेचे प्रश्न, राज्यातील दुर्घटना, भ्रष्टाचार यावर अधिवेशन काळात विरोधक जोरदार आवाज उठवतात. सध्या राज्याचे पावसाळी अधिवेशन मुंबईत सुरू आहे. ३० जूनपासून अधिवेशनाला सुरुवात झाली असून, आठवड्याच्या पहिल्या पाच दिवसांत फक्त अन् फक्त आरोप-प्रत्यारोप. बाकी जनतेच्या समस्या कायम आहेत. अधिवेशनामुळे राज्यातील जनतेला काय मिळते आहे, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. निवडणुका जवळ आल्या की, जनतेचे आम्हीच कैवारी असा टेंभा सर्वच राजकीय पक्षांकडून मिरवला जातो. त्यात यंदाचे वर्षही निवडणुकीचे. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत या निवडणुका पुढील तीन ते चार महिन्यांत पार पडणार आहेत. सध्या पावसाळी अधिवेशन सुरू असून मुंबई महापालिका निवडणुकीआधीचे हे आताचे अधिवेशन. त्यामुळे पावसाळी अधिवेशनात राज्यातील जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य असणार आहे. सोमवार, ३० जूनपासून अधिवेशनाला सुरुवात झाली. जनतेच्या प्रश्नांवर लोकप्रतिनिधी आक्रमक भूमिका घेत असल्याचे दिसून येते. जनतेच्या प्रश्नांवरून सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर तुटून पडतात, आजच समस्यांचे निवारण होईल, असे चित्र निर्माण होते; मात्र आरोप-प्रत्यारोप करण्यात दिवसभराचे कामकाज संपते आणि जनतेचे प्रश्न वेटिंगवरच राहतात. राज्यात महायुतीचे हे तिसरे अधिवेशन. डिसेंबर २०२४मध्ये नागपूर येथे हिवाळी अधिवेशन, फेब्रुवारी २०२५ मध्ये मुंबईत अर्थसंकल्पीय अधिवेशन आणि आता तिसरे पावसाळी अधिवेशन मुंबईत. विधिमंडळाच्या सभागृहात व परिषदेत राज्यातील १३ कोटी जनतेचे प्रश्न मांडत त्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मिळवणे हा अधिवेशनाचा मुख्य उद्देश; मात्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला जनतेचा मिळालेला कौल महाविकास आघाडीच्या नेत्यांना पटलेला नाही. त्यामुळे महायुतीचे एखादे प्रकरण बाहेर पडताच मविआ नेते महायुतीवर तुटून पडतात. विधानसभा, विधान परिषद, विधिमंडळाच्या पायऱ्यांवर मविआचे नेते महायुतीवर आरोपांच्या फैरी झाडतात. आरोप- प्रत्यारोप केले जातात, विरोधक आरोप करतात, सत्ताधारी आरोप फेटाळून लावतात. यातून निष्पन्न काहीच होत नाही. त्यामुळे पावसाळी अधिवेशनात सर्वपक्षीय नेतेमंडळींकडून सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर हवा तसा आवाज उठवला जात नाही. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने 'लाडकी बहीण' योजना सुरू केली. प्रत्येक महिलेला दर महिना दीड हजार देण्याचा निर्णय घेतला आणि अंमलबजावणीला सुरुवात केली. ऐन विधानसभा निवडणुकीत दीड हजार रुपयांवरून दोन हजार १०० रुपये हे करण्याचे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी दिले; मात्र, निवडणुका होताच राज्य सरकारने या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांची छाननी सुरू करून अपात्र बहिणींना योजनेतून वगळण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत नऊ लाखांहून अधिक बहिणी अपात्र ठरल्या आहेत. विरोधकांनी यावरून सरकारवर टीका केली. हा मुद्दा आक्रमकपणे विरोधक अधिवेशनात लावून धरत महायुतीची कोंडी करण्याचा प्रयत्न केला; मात्र आरोप-प्रत्यारोप यात आठवड्याचे अधिवेशन गुंडाळले अन् सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जैसे थे राहणार हे कटू सत्य कोणी नाकारू शकत नाही. राजकारणाचा पॅटर्न हळूहळू बदलतोय. आधीच्या राजकारणात सामाजिक उपक्रम राबवणे, सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी भांडणे आणि न्याय मिळवून देणे ही जबाबदारी लोकप्रतिनिधी पार पाडत होते. परंतु आता राज्यकर्त्यांनी राजकारणात आरोप-प्रत्यारोपांची परंपरा आणली आहे. २० टक्के राजकारण अन् ८० टक्के समाजकारण हे वाक्य आता बदलत आहे. सध्याचे राजकारण हे जनतेसाठी कमी आणि स्वतःसाठी अधिक, असे एकूण चित्र दिसते. पावसाळी अधिवेशनाचा पहिला आठवडा संपला असून, यात सत्ताधाऱ्यांविरुद्ध विरोधक एकमेकांवर समोर उभे ठाकले. शेतकऱ्यांचे प्रश्न, भ्रष्टाचार या मुद्द्यावर आवाज उठवणे काळाची गरज असून, आवाज उठवला जातो, सत्ताधारी पक्षाचे मंत्री आश्वासनही देतात; मात्र पुढे काय, भ्रष्टाचाराची चौकशी, अहवाल यात सगळे शांत होते. अधिवेशनात सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढावा यासाठी सत्ताधारी व विरोधक यांनी निदान प्रयत्न तरी करावा, हीच सर्वसामान्य जनतेची माफक अपेक्षा आहे.

## ही लोक ठरतात भोंदूबाबांचे बळी!

देव आणि धर्माच्या नावावर आर्थिक लूटमार किंवा शारीरिक शोषण झाल्याचे प्रकार जगभर आणि देशभर मोठ्या प्रमाणात घडले आहेत. तरी देखील बरेचजण अशा भोंदूबाबांच्या नादी का लागतात? याची बरीच कारणे आहेत. प्रत्येक माणसानुसार त्याच्या समस्या वेगवेगळ्या असू शकतात. प्रत्येकाला त्याच्या समस्येवर उपाय हवा असतो. तो उपाय शोधताना मनाने हरलेली माणसे भोंदूबाबांच्या जाळ्यात सापडतात. जीवनात समस्या या निर्माण होतच असतात. परंतु, समस्या सोडवण्यासाठी योग्य मागार्चा आणि मार्गदर्शनाचा उपयोग न करता भोंदूबाबांचा आधार घेतला जातो. त्यामुळे भोंदूबाबा पुन्हा पुन्हा उदयाला येतात. लोकांची फसवणूक करत राहतात.

काही वर्षांपूवीर्ची गोष्ट आहे. मी माझ्या एका नातेवाईकासोबत एका बाबाच्या आश्रमात गेलो होतो. त्याला त्याच्या मित्राने या बाबाविषयी सांगितलं होतं. (व्यवसायाच्या भाषेत बोलायचं झालं तर रेफरन्स दिला होता). त्या नातेवाईकाच्या बर्याच कौटुंबिक समस्या होत्या.तो देवांची भक्ती करत नव्हता असे नाही, पण त्याच्या समस्या त्या देवाच्या भक्तीने सुटर्णाया नव्हत्या, अशी त्याची भावना झाली असेल. असो. तर अशा या नातेवाईकासोबत त्याच्या दुःखाच्या आजारावर औषध आणण्यासाठी मी पण राज्यातील एका मिनी शहराच्या बाजूला एका गावात एका बाबाच्या आश्रमात गेलो होतो. स्टेशनला उतरलो. त्यानंतर चार ते पाच किलोमीटर अंतरावर गावात या बाबाचा आश्रम होता. आश्रमात टेम्पो, टमटम भरून आजूबाजूच्या गावातील माणसं आली होती. आश्रमाच्या बाहेर गाड्यांची रांग लागली होती. मोठमोठ्या शहरांतूनदेखील मोठ्या प्रमाणात माणसं आली होती. हा बाबा स्वतःला अवतार समजायचा. तशी व्यवस्था त्याने आपल्या आजूबाजूला केली होती. पूजाअर्चा करण्यासाठी त्याच्यासोबत त्याची भक्त मंडळी होती. या बाबाचा दरबार भरायचा.

आता मजा बघा! त्या दरबारात जाताना, मोबाईल बंद करायला सांगितला जायचा, कोणत्याही प्रकारचे चित्रीकरण अथवा फोटो तेथे काढण्यास मनाई होती. यातच सर्व आलं. विशेष म्हणजे या बाबाचं बिझनेस मॉडेल हटके होतं. भोळ्या भक्तांकडून येर्णाया देणग्या सोडा, पण हा बाबा आश्रमात प्रवेश करताना वडापावमध्ये जो वडा खाल्ला जातो, तो वडा आश्रमात प्रवेश करताना विकत घ्यायला लावायचा आणि ते वडे त्याने बनवलेल्या यज्ञकुंडात टाकायला लावायचा, साधारण एका वड्याची किंमत ही २० रुपयांपेक्षा जास्तच असायची. परंतु, निरनिराळ्या समस्यांनी ग्रासलेल्यांना आणि या समस्यांचं नेमकं उत्तर कुठे आहे, हे न समजर्णाया भाबड्या जीवांना या मागचा व्यवसाय तेव्हा समजत नव्हता, किंवा अजूनदेखील समजत नाहीए. त्यानंतर काही दिवसांनी त्या बाबाचा भंडाफोड झाला. पोलिसांनी त्याला पकडले. आता या घटनेला बराच काळ होऊन गेला आहे. त्यानंतरदेखील असे भोंदूबाबा देशभर, राज्यभर वावरत आहेतच. अनेकजण त्यांच्या जाळ्यात सापडत आहेत.

या आठवड्यातच पुण्यातील एका बातमीनंतर हा बाबा आठवला. पुण्यात लोकांच्या हतबलतेचा फायदा घेत त्यांची फसवणूक करर्णाया एका भोंदूबाबाची हायटेक विकृती समोर आली आहे. प्रसाद दादा ऊर्फ बाबा ऊर्फ प्रसाद तामदार या तथाकथित बाबाविरोधात बावधन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली असून, त्याच्या विरोधात गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तपासादरम्यान पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली आहे. आरोपी भोंदूबाबा भक्तांच्या मोबाईलमध्ये ह्यहिडन ॲपह्ण डाऊनलोड करून त्यांच्या खासगी क्षणांवर नजर ठेवत असे. याशिवाय, तो भक्तांना गुंगीचे औषध देऊन अश्लील चाळे करत होता. या कृत्याची झलक तपासात पाच वेगवेगळ्या भक्तांच्या चौकशीतून समोर आली आहे. बाबा स्वतःला भक्तांचे दोष स्वतःवर घेतो, त्यांच्यावर संकट आहे, आणि त्यासाठी विशिष्ट उपाय करतो, अशी बतावणी करत असे. एखादा भक्त त्याच्या या कृतीला विरोध करत असे, तर तो एका कागदावर मृत्यूची तारीख लिहून भीती दाखवत असे, की त्या दिवशी तू मरशील! त्यामुळे अनेक भक्त मानसिक दबावाखाली त्याच्या सांगण्यानुसार वागत होते. विशेष म्हणजे ह्यआरोपीने भक्तांचे खासगी क्षण ह्यहिडन ॲपह्णद्वारे रेकॉर्ड करून लॅपटॉपमध्ये सेव्ह केल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीने पुरुषांप्रमाणेच महिला व लहान मुलांचीही फसवणूक केली असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मूळात प्रश्न हा आहे, की याआधीही देव आणि धर्माच्या नावावर अशी आर्थिक लूटमार किंवा शारीरिक शोषण झाल्याचे प्रकार जगभर आणि देशभर मोठ्या प्रमाणात घडले आहेत. काही गाजले आहेत. तरी देखील बरेचजण अशा भोंदूबाबांच्या नादी का लागतात? याची बरीच कारणे आहेत. प्रत्येक माणसानुसार त्याच्या समस्या वेगवेगळ्या असू शकतात. प्रत्येकाला त्याच्या समस्येवर उपाय हवा असतो. तो उपाय शोधण्यासाठी गेलेली ही



दुबळी माणसे अशा भोंदूबाबांच्या जाळ्यात सापडतात. मूळात माणूस म्हटला की, त्याला समस्या असणारच. एक संपली की दुसरी. हे जिवंत असण्याचे लक्षण आहे. भौतिक सुखात रमताना, आजूबाजूच्या सजीवांच्या सहवासात राहताना दुःख, वेदना, चांगल्या वाईट भावना या आहेतच. समाजात वावरताना आणि जगताना समस्या या निर्माण होतच असतात. परंतु, अशा समस्या सोडवण्यासाठी एखाद्या भोंदूबाबाचा आधार घेतला जातो तेव्हा समस्येचे निराकरण सोडा, माणसं लुबाडली जाण्याचीच शक्यता जास्त असते.

धर्म, संस्कृती कोणतीही असो, त्यात जगण्याची कला (आर्ट ऑफ लिव्हिंग) ही शिकवली जाते. जन्म झाल्यापासून मृत्यूच्या दिशेने सरकणारे सजीवांचे आयुष्य असते. त्यातही या अशाश्वत आणि नश्वर आयुष्यात अनेक समस्या निर्माण होणार आहेत. काही वेळा त्या मानवनिर्मित असतात किंवा काही वेळा त्या निसर्गनिर्मित असतात. एवढे हे कधीही न संपणारे आणि समस्यांनी भरलेले आयुष्य चांगलं कसं जगता येईल म्हणून धर्म, संस्कृती यांचा उदय झाला असावा. प्रत्येक धमार्ची आणि संस्कृतीची जगण्याची पद्धत सांगण्याचा मार्ग वेगवेगळा असू शकतो. परंतु, सर्वांचा उद्देश हा छान, सुंदर आणि शक्य तितकं तणावविरहित आयुष्य जगायला शिकवणं हाच असतो.

कोण्या एका धर्मात ईश्वर एक आहे असं समजून त्याला स्मरून आपलं आयुष्य सुंदर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असं सांगितलं जातं, तर कोणी त्याला वेगवेगळ्या रूपात पाहून आपले आयुष्य सुखकर करावे अशी शिकवण दिली जाते. परंतु, बरेचजण धर्म, संकृती यांच्याकडे त्या पद्धतीने पाहतात का? हा सर्वांत मोठा गहन प्रश्न बनून राहिला आहे. साधं ध्यान (मेडिटेशन) केलं तरी माणसाच्या आयुष्यातील अर्ध्या अधिक समस्या सुटण्याची शक्यता असते. ईश्वराला मानणे, धार्मिक परंपरा जपणे, पूजाअर्चा करणे यांचा उपयोग करून आपलं आयुष्य सुंदर कसं जगता येईल, याचे धडे अनेक धार्मिक आणि संस्कृतीसंबंधी ग्रंथात दिलेले आहेत. परंतु, एवढे सर्व जगण्याचे भांडार उपलब्ध असताना काहीजण या भोंदूबाबांकडे का वळतात? तर त्यांना त्यांच्या आयुष्याचा अर्थ आणि मयार्दा या उमगलेल्या नसतात कदाचित. आपल्या आयुष्यात काही तरी मिळवायचं आहे, मग ती वैयक्तिक इच्छा असो वा सामाजिक प्रतिष्ठेतून निर्माण झालेल्या गरजा असोत, हा बर्याच जणांचा उद्देश असतो. त्यासाठी बरेच जण भक्ती करत असतात. मग ते कोणत्याही धमार्चे असोत. ते ज्या ईश्वराला, धमार्ला, संस्कृतीला मानत आहेत किंवा पाळत आहेत, ते का पाळत आहेत? त्यांचा उद्देश काय आहे, हे त्यांनीच तपासणे गरजेचे आहे. तरच ते अशा भोंदूबाबांच्या कचाट्यातून सुटू शकतात.

पूर्वीच्या अनुभवांतून माणूस शिकत नसल्यामुळे अनेक भोंदूबाबा पुन्हा पुन्हा उदयाला येत असतात. त्यांनी केलेली दुष्कृत्ये उघड झाली तरी अशा फसवणुकींच्या प्रकरणांमध्ये मोठा फरक पडणार आहे असं नाही. देशातील कायदा त्याचे काम करेलच, पण त्यामुळे अशा समस्यांचे मूळापासून उच्चाटन होणार आहे असं नाही. त्यासाठी प्रत्येकाने आपल्याला आयुष्यात नेमकं काय हवंय? चांगलं आयुष्य आपल्याला कसं जगता येईल? याचा शोध प्रत्येकाने त्याच्या धमार्चा आणि संस्कृतीचा नीट अभ्यास करून घेणं गरजेचं आहे. तरच देवाच्या नावाने फसवणूक करर्णाया आणि स्वतःला देवाचा किंवा संतांचा अवतार असल्याचा दावा करर्णाया भोंदूबाबांना चाप बसू शकेल.

## माळेगावची साखरपेरणी

बारामतीमधील बहुचर्चित माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपले एकहाती वर्चस्व सिद्ध केले आहे. गेले काही दिवस सुरू असलेल्या 'पवार विरुद्ध पवार' या लढाईत कारखान्यातील २१ पैकी २० जागा त्यांच्या निळकंठेश्वर पॅनेलने जिंकून खुद्द शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांना पुन्हा एकदा पराभवाचा धक्का दिला. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीनंतर पवार कुटुंबातील वर्चस्वाची लढाई, म्हणून या निवडणुकीकडे पाहिले जात होते. त्यामध्ये साखर कारखान्याच्या संचालकपदापासूनच राजकारण सुरू करणारे अजित पवार आता सहकाराच्या क्षेत्रात किती मुरले आहेत, यावर शिक्कामोर्तब झाले. त्यातच गेल्या काही दिवसांत 'राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येणार,' अशा चर्चा रंगल्या होत्या; त्या पार्श्वभूमीवर दोन्ही पवार काय भूमिका घेणार, याची झलक या निमित्ताने पहावयास मिळाली. या निवडणुकीत मिळालेल्या विजयाचे मोठे श्रेय स्वतः अजित पवारांनाच जाते. शरद पवार हे घरच्या मैदानावरील सामन्यात राखून ठेवलेला एखादा डाव टाकू शकतात, अशी चर्चा होती; त्यामुळे अजित पवार यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. 'कसोटीतील खेळाडूने गल्ली क्रिकेटमध्ये खेळावे का,' हा प्रश्न असला, तरी वर्चस्व दाखवून देण्यासाठी या निवडणुकीत उतरणे, ही त्यांच्यासाठी अपरिहार्यता होती. कार्यकर्त्यांमधील वर्चस्वाची स्पर्धा रोखण्यासाठी बारामतीत तळ ठोकून 'मीच कारखान्याचा अध्यक्ष होणार,' या त्यांनी केलेल्या घोषणेचा विजयात मोठा वाटा आहे. उसाला सर्वाधिक दर, कारखान्याला पाचशे कोटी रुपयांची आर्थिक मदत अशा घोषणांचा त्यांनी पाऊस पाडला. त्या तुलनेत शरद पवार यांनी स्वतः आघाडीवर न राहता नातू युगेंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवली. चार पॅनेलमध्ये झालेल्या या निवडणुकीत ज्येष्ठ नेते चंद्रराव तावरे हे विरोधकांपैकी निवडून आलेले एकमेव उमेदवार. तावरे गट भाजपच्या झेंड्याखाली असल्याने महायुतीमध्येही पवार यांच्या वर्चस्वाचा संदेश गेला आहे.

## पावसाळ्यात भुलवणारा निसर्ग आणि पर्यटन बंदी!

**पर्यटकांच्या सुरक्षेचा विचार करून पर्यटनस्थळ बंदी केली जाते तेव्हा छुप्या मार्गानं ट्रेकर ट्रेकिंगकरिता जातात आणि मग दुर्घटना झाल्यावर त्या समोर येतात. निसर्ग अनुभवायचा असेल तर पावसाळयात या डोंगररांगांना भेट दिली जाते. आता घनदाट शहरे झाली आहेत, जिकडे पहावे तिकडे उंचच उंच इमारती दिसत आहेत. पावसाळयात कुटुंबासमवेत नागरिक पावसाळी पर्यटनाला जातात. शासनाने डोंगर परिसरातील पर्यटन स्थळामध्ये जो भाग धोकादायक असेल त्या ठिकाणी नक्कीच बंदी घालावी पण जो भाग धोकादायक नाही तो खुला ठेवावा. कारण पर्यटनांमुळे स्थानिक लोकांनाही पैसे कमावण्याची संधी मिळत असते.**


राज्याला सह्याद्री डोंगररांगांचा इतिहास खूप मोठा आहे, या डोंगररांगांना ठाणे जिल्ह्यापासून सुरुवात होते. यामध्ये निसर्गरम्य उंच डोंगररांगा, हिरवे निसर्गरम्य ठिकाण पाहण्याकरिता आणि पावसाळा आला की दाटीवाटीच्या शहरांमध्ये राहणारे नागरिक एक दिवस शांतता मिळवण्याच्या दृष्टीने निसर्गरम्य ठिकाणी उंच गडकिल्ले तसेच डोंगरांमधील धबधबे पाहण्याकरिता ट्रेकिंगचे आयोजन करून ठिकाण निवडतात.

पण अतिउत्साही पर्यटकांमुळे जंगल परिसरातील पर्यटन स्थळांवर होणाऱ्या दुर्घटनेमुळे शासनाला प्रत्येक वर्षीप्रमाणे यावर्षी उंच डोंगररांगा परिसरातील धबधबे तसेच गडकिल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांना बंदी आणण्याकरिता आदेश काढावा लागतो. पर्यटन स्थळांवर बंदी आणण्यापेक्षा अतिउत्साही पर्यटकांवर लक्ष केंद्रित करण्याकरिता सुरक्षा रक्षक नेमले तर स्थानिक नागरिकांचा रोजगारदेखील वाढेल आणि पावसाळी पर्यटनाला चांगली चालना मिळेल.

हिरव्या निसर्गामध्ये खूप काही दडलेले असून पावसाळ्यामध्ये जंगल परिसरात येणारी वनस्पती तसेच नवनवीन झाडे, फुले, धबधब्यातील पावसाचे पाणी हे पर्यटकांना पाहण्याकरिता भुरळ घालत असतात. पण उत्साही पर्यटकांमुळे अनेक गडकिल्ले आणि पावसाळी पर्यटन स्थळांवर पावसाळ्याच्या दिवसांत स्थानिक प्रशासनाच्या वतीने पर्यटनासाठी बंदी घालण्यात येते. मुसळधार पाऊस, दरड कोसळणे आणि निसरड्या वाटा यामुळे दुर्घटना होण्याची शक्यता असते, त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून ही बंदी लागू करण्यात येते.

याला कारणीभूत जास्त प्रमाणात मोबाईलचा वापर करत सोशल मीडियावर रील बनवणे आणि फेसबुकवर लाईव्ह टाकणे. मी कुठे आलोय हे दाखवण्याकरिता उत्साही तरुण, तरुणी पावसाळी पर्यटनाचा आनंद घेत सोशल मीडियाचा वापर करत असतात. पण हाच वापर कमी केला आणि सुरक्षित ठिकाणी जाऊनच व्हिडीओ आणि फोटो काढले तर अपघाताची शक्यतादेखील कमी होईल. सोशल मीडियाचा वापरच मुळात सर्रास सुरू असल्याने याला किती काही केले तरी कमी करता येणे शक्य नाही.

पण सुरक्षिततेच्या कारणामुळे उंच गडकिल्ले आणि डोंगरांमधील पर्यटन स्थळावर मोबाईलचा शूटिंग करण्याचा वापर कमी झाला तर नक्कीच सुरक्षित पर्यटन सुरू राहील. पावसाळी पर्यटन स्थळ जास्त प्रमाणात वनविभागाच्या हद्दीत येत असल्याने वन विभाग जोरदार पावसामुळे एखादी दरड कोसळण्याच्या घटना होऊ नये, यामुळेदेखील पर्यटन स्थळे बंदी करते. पण वनविभागाच्या हद्दीतील पर्यटन स्थळांवर मोबाईलचा वापर कमी झाला तर पावसाळी पर्यटन स्थळे फिरणे आणि निसगार्चा आनंद घेणे सोपे होईल आणि दुर्घटनादेखील होणार नाहीत.



पर्यटन स्थळावरील उंच धबधबे आणि निसर्गाच्या ठिकाणी खोल दरी पाहण्याकरिता पर्यटक तसेच ट्रेकर नवीन काही तरी पाहण्याकरिता जात असतात. तसेच आपण ज्या पर्यटन स्थळावर गेलो त्या ठिकाणची आठवण म्हणून व्हिडीओ शूट करून सोशल मीडियावर टाकण्याकरिता उत्साही असतात.

सध्या सोशल मीडियाचाच जमाना सुरू असल्याने पर्यटन स्थळावरील फोटो आणि व्हिडीओ शूट करणे काही वावगं नाही आहे. पण स्वतःच जीव धोक्यात घालून फोटो आणि व्हिडीओ शूटिंग करणे घातक आहे. यामुळे धोकादायक ठिकाणी वनविभागाने धोकादायक ठिकाणी फोटो आणि व्हिडिओ शूटिंग करणे टाळा असे सूचना फलक लावणे आवश्यक आहेत.

ठाणे शहराजवळ लागून बोरिवली नॅशनल पार्कमधील येऊर परिसर, अंबरनाथ तालुक्यातील कोंडेश्वर धबधबा, भोज, दहिवली, आंबेशिव नदी, चंदेरी गड, चांदप, आस्नोली नदी, बारवी नदी, कल्याण तालुक्यातल्या कांबा, पावशेपाडा, खडवली नदी, टिटवाळा नदी, गणेश घाट, मुरबाड तालुक्यातील सिद्धगड, डोंगरन्हावे, सोनाळे, हरिश्चंद्रगड, बारवी धरण परिसर, पडाळे धरण, माळशेज घाट, नाणेघाट, गोरखगड, भिवंडी तालुक्यातील दुगडगड, गणेशपुरी नदी परिसर आणि शहापूर तालुक्यातील भातसा धरण परिसर, माहुली किल्ला आणि पायथा, अशोक धबधबा, आजा पर्वत, सापगाव नदी किनारा, कळंबे नदी, कसारा घाट आणि घाटातले धबधबे अशी अनेक पर्यटन स्थळे ठाणे जिल्ह्यात येतात.

या पर्यटन स्थळांवर पावसाळा आला की दरवर्षी पर्यटन बंदी करण्यात येते. पण याऐवजी सुरक्षित ठिकाणी पर्यटन सुरू असणे आवश्यक आहे. या पर्यटन स्थळांवर ज्या ठिकाणी धोकादायक परिसर असेल त्या ठिकाणी लोखंडी जाळी लावून प्रवेश बंदी करणे आवश्यक आहे. पण ज्या ठिकाणी एक ठिकाण पर्यटन स्थळाकरिता बंद असेल तर दुसरे ठिकाण शासनाने खुले ठेवणं आवश्यक आहे.

पर्यटन स्थळ बंदी केले तरी सुद्धा छुप्या मार्गानं ट्रेकर ट्रेकिंगकरिता जातात आणि मग दुर्घटना झाल्यावर त्या समोर येतात. मुळात राज्याला सह्याद्री डोंगररांगांचा मोठा निसर्ग लाभला आहे आणि हा निसर्ग अनुभवायचा असेल तर पावसाळ्यात या डोंगररांगांना भेट दिल्यानंतर जो आनंद मिळतो तो उन्हाळा आणि हिवाळ्यात मिळत नाही. आता घनदाट शहरे झाली आहेत, जिकडे पहा तिकडे उंचच उंच इमारती दिसत आहेत.

नागरिकांना हिरवा निसर्ग पाहून डोळ्यांना जी शांतता मिळते ती शहर परिसरात मिळत नाही. पावसाळ्यात कुटुंबासमवेत नागरिक पावसाळी पर्यटनाच्या दिशेने आपली वाट निवडत आहेत. शासनाने डोंगर परिसरातील पर्यटन स्थळामध्ये जो भाग धोकादायक असेल त्या ठिकाणी नक्कीच बंदी घालावी पण जो भाग धोकादायक नाही तो खुला ठेवावा. ज्यामुळे पर्यटकांना निसर्गाचा आनंद घेता येईल. अशा ठिकाणी पर्यटकांनी मोबाईलचा वापर कमी करावा.

धोकादायक ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमावे. पावसाळ्यात निसर्गाचा आनंद घेण्यावर बंदी घालणे योग्य नाही. ट्रेकिंगमुळे नागरिकांच्या आरोग्याला खूप फायदा होत असतो. संपूर्ण शरीराचा व्यायाम होत असल्याचे अभ्यासक सांगत आहेत. यामुळे पावसाळी ट्रेकिंगकरिता जिल्ह्यातील अतिधोकादायक ठिकाणे असतील या ठिकाणी नक्कीच पर्यटन बंदी ठेवावी पण ज्या ठिकाणी पायी चालत जाऊन पर्यटक निसर्गाचा आनंद घेतील अशा ठिकाणी पर्यटन बंदी कमी करणे आवश्यक आहे.

पर्यटन स्थळे बंदी झाली की स्थानिक रोजगारदेखील बंद होतात, धबधब्याच्या ठिकाणी काही दुर्घटना घडली की, स्थानिक प्रशासन पातळीवर तात्काळ बंदी घातली जाते, पण या पावसाळी पर्यटन स्थळांच्या ठिकाणी येणारे पर्यटक बंद झाले की, स्थानिक नागरिकांचे रोजगारदेखील बंद होतात, यामुळे पर्यटन स्थळांवर सुरक्षा रक्षक नेमून अपघातांवर नियंत्रण मिळवले तर पावसाळी पर्यटनदेखील चांगल्या प्रकारे सुरू राहील आणि हिरव्या निसर्गाचा आनंददेखील पर्यटकांना चांगल्या प्रकारे घेता येईल.

पर्यटन स्थळे जास्त प्रमाणात गडकिल्ल्यांच्या ठिकाणीदेखील आहेत. ठाणे जिल्ह्यातील गडकिल्ल्यांच्या ठिकाणी धबधबे तसेच इतिहासाच्या खुणा पाहण्याकरिता मोठ्या प्रमाणात राज्यातील तसेच देशभरातून पर्यटक येत असतात. यामध्ये पावसाळी पिकनिकच्या दृष्टीनेदेखील पर्यटकांची ये-जा सुरू असते.

पावसाळा आला की, रोजगाराच्या दृष्टीने अळूची भाजी, कंटोली, शेवळा, अंबाडी, भोकर, घोळ, कोवळे बांबू, टाकला ह्या रानभाज्या घेऊन स्थानिक नागरिक पर्यटन स्थळाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भाज्या विक्री करीत असतात. यामुळे एखादी घटना घडली की, पर्यटन स्थळांवर बंदी येते. याचा परिणाम स्थानिक रोजगारावर होतो.

यामुळे शासनाने पर्यटन स्थळावर पावसाळ्यात बंदी आणण्यापेक्षा पर्यटन स्थळांवर सुरक्षा रक्षक नेमून धोकादायक परिसर बंद करून इतर परिसरात पावसाळी हिरव्या निसर्गाचा आनंद घेण्याकरिता पर्यटकांना परवानगी देणे आवश्यक आहे. यामुळे पावसाळी पर्यटनाचादेखील नागरिकांना आनंद घेता येईल तसेच स्थानिक नागरिकांचा रोजगाराचा प्रश्न देखील सुटेल. काही देशांची तर संपूर्ण अर्थव्यवस्था पर्यटनावर अवलंबून असते.

कारण त्यांच्याकडे उत्पन्नाचे अन्य स्त्रोत नाहीत. सगळ्यात पहिली गोष्ट म्हणजे पर्यटन स्थळांवर स्वच्छता राखणे अतिशय महत्त्वाचे आहे. जे पर्यटक जातात, त्यांना कितीही सांगितले आणि फलक लावले तरी प्लास्टिकच्या बाटल्या आणि अन्य कचरा टाकून परिसर घाण करतात. कचरा दरीत फेकून देणे हा उपाय नाही. त्यामुळे आपल्याला आंनद देणाऱ्या निसर्गाचे संवर्धन व्हायचे असेल तर त्याला हानिकारक ठरणारा कचरा तिथे जमता कामा नये, याचीही सरकारला काळजी घ्यावी लागेल.




करात कपात सुचवितानाच संरक्षणावरील खर्च वाढविणारे; परंतु सामाजिक सुरक्षेची तरतूद करणारे विधेयक अमेरिकी संसदेच्या वरिष्ठ सभागृहात मंजूर करून घेण्यात अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना यश आले असले, तरी प्रतिनिधिगृहाकडून मान्यता मिळविण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. 'मोठे' आणि 'सुंदर' अशा शब्दांत वर्णन केलेले हे विधेयक सिनेटमध्ये निसटत्या बहुमताने मंजूर झाले.

ट्रम्प यांनी पहिल्या कार्यकाळात केलेल्या करकपातीला कायम स्वरूप देण्यासाठी आणि निवडणूक प्रचारातील मोठ्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी या विधेयकाद्वारे ट्रम्प यांनी कंबर कसली असली, तरी खुद्द त्यांच्याच पक्षातील काहींच्या विरोधाला त्यांना सामोरे जावे लागत आहे. सिनेटमधील विधेयकावरील चर्चेत याची प्रचिती आली, म्हणूनच अवघ्या एका मताने विधेयक मंजूर झाल्यानंतर ट्रम्प यांनी सुटकेचा निःश्वास सोडला; आपल्याला झालेला आनंदही लपविला नाही. ट्रम्प यांच्यासाठी प्रतिष्ठेचे असलेल्या या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाल्यास तेथील उच्च उत्पन्न गटातील लोकांना लाभ होणार असला, तरी अन्नासाठी सरकारी योजनेवर अवलंबून असलेल्या गरिबांना आणि सरकारी आरोग्य कवचाचा लाभ घेणाऱ्यांना फटका बसणार आहे.

या विधेयकामुळे सुमारे ४.५ लाख कोटी डॉलरची करकपात होणार असली आणि संरक्षणावरील खर्च वाढणार असला, तरी यामुळे पुढील दहा वर्षांत अमेरिकेवरील कजार्चा बोजा तब्बल ३.३ लाख कोटी डॉलरने वाढणार आहे. म्हणूनच या विधेयकाला विरोध होत आहे. सामाजिक सुरक्षा कमकुवत करणारे हे विधेयक प्रतिगामी असल्याचा शेरा मारला जात आहे. यामुळे अमेरिकी अर्थव्यवस्थेला धक्का पोहोचणार असल्याचेही सांगितले जात आहे. हे विधेयक पर्यावरणाचे संतुलन साधणाऱ्या योजनांना कात्री लावणारे असल्याकडेही लक्ष वेधले जात आहे. मात्र, एकंदरीत ट्रम्प यांच्या राजकारणाचे आणि त्यांच्या राजकीय शैलीचे प्रतिबिंब या विधेयकात आहे. आपला मतदारवर्ग कोणता आणि त्याला काय हवे आहे, हे ओळखून ट्रम्प यांनी करकपातीवर भर दिला आहे.

अमेरिका-मेक्सिको सीमेवर संरक्षण भिंत बांधण्याचा उल्लेख ते अध्यक्षपदाच्या पहिल्या निवडणुकीच्या प्रचारापासून करीत आहेत. याबाबतच्या आश्वासनांची पूर्तता ते या विधेयकाद्वारे करीत आहेत. अमेरिकेत सुमारे सात कोटी लोकांना ह्यमेडिकेडह्णचे आरोग्यविमा कवच आहे. ट्रम्प यांचे हे विधेयक प्रत्यक्षात आल्यास एक कोटींहून अधिक लोकांचे आरोग्यविमा कवच जाऊ शकते. अशा या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाल्यास तो ट्रम्प यांचा विजय नक्की असेल.

# मशरुम्सची भाजी



**साहित्य** : मशरुम - २०० ग्रॅम, कांदा - १ मध्यम आकाराचा, तिखट - १ चमचा, हळद - १/२ चमचा, मीठ - चवीनुसार, जिरे - १ छोटा चमचा, तेल - फोडणीसाठी, आले-लसूण पेस्ट - १ छोटा चमचा, थोडी कोथिंबीर.

**पाककृती** : कांदा, कोथिंबीर बारीक चिरून घ्या. मशरुम्स उभे पातळ कापून घ्या. फोडणीसाठी तेल गरम करून जिरे, आले-लसूण पेस्ट, कांदा घालून परतून घ्या. कांदा थोडा शिजल्यावर मशरुम्स घालून परतून घ्या. नंतर हळद आणि तिखट घाला. झाकण ठेवून २ मि. शिजू द्या. या वेळात मशरुम्सना पाणी सुटेल, मग मीठ व कोथिंबीर घालून, गॅस मध्यम आचेवर ठेवून हे पाणी आटेपर्यंत शिजू द्या.

# चेहऱ्यावरील तीळ हटवण्याचे आठ घरगुती उपाय

**चेहऱ्यावरचा एखादा तीळ ब्यूटीमार्क असू शकतो. परंतु, चेहऱ्यावर अधिक तीळ असल्यास किंवा त्यांची जागा चुकीची असल्यास ते खटकतात. शरीरावरील तीळ काढून टाकण्यासाठी काही डर्मेटोलॉजिक ट्रीटमेंट आहेत, परंतु घरगुती उपायांनीदेखील तीळ हटवले जाऊ शकतात, हे तुम्हाला ठाऊक आहे का?**



- कपभर अननसाचा रस आणि पाव कप सैंधव मीठ एकत्र करा. या मिश्रणाने स्क्रब केल्यास चेहऱ्यावरील तीळ कमी होण्यास मदत होईल.
- लसणाची पेस्ट रात्री झोपण्यापूर्वी तिळावर लावा. त्यावर बॅण्डेज लावा. सकाळी उठल्यावर त्वचा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा. हा प्रयोग नियमित केल्यास तिळाचा त्रास कमी होण्यास मदत होईल.
- काही आल्याचे तुकडे ठेचून तिळाच्या जागी लावा. त्यावर कपडा बांधून झोपा. या उपायानेही तीळ कमी होण्यास मदत होते.
- व्हिटॅमिन सीची एक गोळी बारीक कुटा. रात्री ही पेस्ट तिळावर लावून, त्यावर बॅण्डेज लावून झोपा.
- व्हिनेगरचा वापर करूनदेखील तीळ हटवला जाऊ शकतो. सुरुवातीला चेहरा गरम पाण्याने धुवा. कापसाच्या बोळ्याने व्हिनेगर तिळावर लावा. १० मिनिटांनंतर चेहरा गरम पाण्याने स्वच्छ धुवावा.
- कोथिंबीरच्या काही पानांची पेस्ट करा. ही पेस्ट काही दिवस तुम्हांला नको असलेल्या तिळावर नियमित लावा.
- एरंडेल तेलाच्या मॉलिशमुळेदेखील तिळापासून सुटका मिळू शकते. हळूहळू तीळ कमी होण्यास सुरूवात होईल.
- मध आणि सूर्यफूलाच्या बीयांच्या तेलाचे मिश्रण करा. या मिश्रणाचा तीळावर पाच मिनिटं मसाज करा. यामुळे त्वचा तजेलदार होईल सोबतच तिळ कमी होण्यास मदत होईल.



# मधुमेह आणि फळे

**मधुमेह हा आजार असलेल्या व्यक्तींनी आहाराबाबत सजग राहणे आवश्यक असते. फळांचे सेवन करताना काळजी घेतली पाहिजे, अन्यथा या फळांच्या सेवनाने रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. बऱ्याच जणांचा असा गैरसमज असतो की फळांमध्ये नैसर्गिक साखर असल्याने रक्तातील साखर वाढत नाही. फळे सेवन केलेली चालतात, असे मानून मधुमेहाचे रुग्ण फळांचे सेवन करतात. पण फळांमध्ये असलेली नैसर्गिक साखर हानीकारक ठरू शकते.**



**चेरी** : चेरीमध्ये खूप जास्त साखर असते, त्यामुळेच आईस्क्रीम आदी गोष्टी तयार करण्यासाठी चेरीचा वापर केला जातो. एका चेरीमध्ये सुमारे ८ ग्रॅम साखर असते, त्यामुळे चेरीचे सेवन करताना काळजी घेतली पाहिजे आणि विशिष्ट प्रमाणातच चेरीचे सेवन केले पाहिजे. चेरीच्या सेवनाने रक्तातील शर्करेची पातळी वाढू शकते.

**आंबा** : आंबा हा वर्षातून एकदाच मिळणाऱ्या फळांपैकी एक आहे आणि बहुतेकांना आंबा खूप आवडतो. परंतु त्यातही नैसर्गिक साखरेचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांनी आंब्याचे सेवन करणे शक्यतो टाळले पाहिजे. सर्वसाधारणपणे एका आंब्यामध्ये ४५ ग्रॅम इतकी नैसर्गिक साखर असते.

**द्राक्षे** : रक्तातील साखरेची पातळी योग्य राखायची असेल, तर द्राक्षांचे सेवन करणे टाळावे. कारण द्राक्षेही गोड असतात. एक कप द्राक्षांतून शरीरात २३ ग्रॅम साखर जाऊ शकते.

**लिची** : हे फळही जास्त साखरेचे प्रमाण असलेल्या फळांपैकी एक आहे. त्यामुळे रक्तातील साखर वाढू शकते. एक कप लिची फळांमध्ये २९ ग्रॅम एवढी नैसर्गिक साखर असते.

**डाळिंब** : डाळिंब रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढवते, परंतु त्यातही साखरेचे प्रमाण अधिक असल्याने त्याचे सेवन केल्यास मधुमेही रुग्णांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. एका साधारण आकाराच्या डाळिंबामध्ये ३९ ग्रॅमपर्यंत साखर असते. मधुमेही रुग्णांनी डाळिंबाचे सेवन टाळले पाहिजे.

मधुमेही रुग्णांनी वरील फळे टाळावी तसेच कोणतेही इतर फळ सेवन करताना विशिष्ट प्रमाणातच सेवन करावे, जेणेकरून रक्तशर्करेचे प्रमाण योग्य राहील. मधुमेही रुग्णांना रक्तातील साखर कमी होऊ द्यायची नसते, तशीच ती वाढूनही उपयोग नाही, त्यामुळे ठरावीक वेळेला आहार सेवन करतानाही तो योग्य प्रमाणात सेवन केला पाहिजे.

# व्यायामानंतर खाज येत असल्यास...

**खाज** येण्याच्या समस्येला प्रुराईटस देखील म्हटले जाते. व्यायामादरम्यान खाज आल्याने त्वचेच्या पेशींना त्रास होतो किंवा इरिटेशन होते. सर्वसाधारणपणे अचानक तापमानात झालेले बदल, संसर्ग किंवा सौंदर्यप्रसाधनांची प्रतिक्रिया यामुळे हे होते. काही व्यक्तींमध्ये प्रतिकारशक्ती कमजोर असल्यास ही लक्षणे दिसतात. अशाच प्रकारे जेव्हा आपण वेगात चालतो तेव्हा किंवा थंड जागेवरून गरम जागी जातो आणि थोडे श्रम करतो, तेव्हा खाज येऊ शकते. शरीरातील नसांमध्ये प्रुरिसेप्टर्स असतात. जेव्हा वातावरणात अचानक बदल होतो किंवा त्वचेवर कोणतीही रासायनिक प्रतिक्रिया दिसते, तेव्हा हे प्रुरिसेप्टर्स कार्यान्वित होतात आणि मेंदू आणि मणका यांना संकेत पाठवतात. त्या संकेतांऐवजी मेंदू शरीरात अशा प्रकारच्या रसायनांची निर्मिती सुरू करतो जी या शारीरिक अवस्थेशी निपटण्यासाठी आवश्यक असते. शरीराची ही प्रतिक्रिया समजण्यासाठीच खाज येण्याची समस्या सुरू होते. शरीरांतर्गत रसायनांमुळेही पित्ताची समस्या निर्माण होते.

**खाज कशी दूर करावी?**

- व्यायामादरम्यान किंवा वेगाने चालताना किंवा अतिश्रम केल्यास शरीराला खाज येत असल्यास व्यायाम आणि श्रमाचे काम ताबडतोब थांबवा. एखाद्या उष्ण जागी असाल तर थंड जागी जाऊन थांबा. अशा परिस्थितीत हिवाळ्यापासून बचाव करण्यासाठी उबदार कपडे घातले असतील तर तेही काढून टाका आणि शरीराचे तापमान सर्वसामान्य कसे करता येईल यासाठी प्रयत्न करा. सतत खाज येत असेल तर वैद्यकीय सल्ला अवश्य घ्यावा.
- थंडीमुळे होणाऱ्या पित्ताने वैतागला असाल तर थंड पाण्याचा शेक घ्या. त्यामुळे रक्तवाहिन्या संकुचित होतात आणि हिस्टामिन या रसायनांचे अतिरिक्त वहन थांबवण्यास मदत करते. त्याचबरोबर पित्तामध्ये खाज येत असेल तर त्यावर उपाय म्हणून अर्धा कप दलिया पाण्याच्या टबात टाकून त्याने स्नान करावे.
- याखेरीज एका वाटीत २ चमचे बेकिंग सोडा घ्यावा आणि त्यात पुरेसे पाणी मिसळावे. ही पेस्ट करून खाज येणाऱ्या जागी लावावी तसेच जिथे पित्त उठले आहे त्यावरही लावावे.



# व्हॉट्सॲप स्टेट्समध्ये शेअर करा एचडी फोटो आणि व्हिडीओ! आलं नवीन फीचर

**व्हॉट्सॲपने एचडी फोटो आणि व्हिडीओ शेअरिंगचा अपडेट दिला आहे. आता व्हॉट्सॲप फोटो आणि व्हिडीओ स्टेट्समध्ये देखील क्वालिटी न बिघडवता शेअर करता येईल. हे फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२३.२६.३ मध्ये उपलब्ध आहे.**

व्हॉट्सॲपने अलीकडेच हाय डेफिनिशन म्हणजे एचडी क्वालिटीमध्ये फोटो आणि व्हिडीओ शेअरिंगचा अपडेट दिला होता. त्यानंतर आता व्हॉट्सॲप एक नवीन अपडेटमधून एचडी फोटो व्हिडीओ स्टेट्स अपडेट करण्याचा ऑप्शन देत आहे. म्हणजे तुम्ही एचडी फॉर्मेटमध्ये फोटो आणि व्हिडीओ आपल्या व्हॉट्सॲप स्टेट्सवर शेअर करू शकाल. सध्या स्टेट्समध्ये फोटो आणि व्हिडीओ शेअर केल्यावर त्याची क्वालिटी



खराब होते. परंतु आता व्हॉट्सॲप फोटो व्हिडीओ शेअर केल्यावर त्यांची क्वालिटी खराब होणार नाही.

**बीटा टेस्टरसाठी लाइव्ह झालं फीचर**

नवीन एचडी फोटो आणि व्हिडीओ शेअरिंग फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२३.२६.३ साठी सादर करण्यात आलं आहे. यात जेव्हा तुम्ही व्हॉट्सॲप स्टेट्स शेअर कराल, तेव्हा तुम्हाला एचडी आयकॉन दिसेल, ज्याच्या मदतीने एचडी फोटो आणि व्हिडीओ स्टेट्स शेअर करता येतील. व्हॉट्सॲपच्या एचडी स्टेट्सची सुविधा बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे. सध्या याचा वापर बीटा टेस्टर करू शकतात. परंतु लवकरच हे फीचर सामान्य युजर्ससाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे.

**कसं वापरायचं एचडी फोटो-व्हिडीओ शेअरिंग फीचर**

- सर्वप्रथम तुम्हाला व्हॉट्सॲपचं बीटा व्हर्जन डाऊनलोड करावं लागेल. गुगल प्ले स्टोअरवरून व्हॉट्सॲपचं बीटा व्हर्जन डाऊनलोड करता येतं.
- यासाठी प्ले स्टोअरवर व्हॉट्सॲप पेज स्क्रोल डाऊन करा. त्यानंतर बीटा टेस्टर सेक्शनमध्ये जा.
- पुढे जॉईन ऑप्शनवर क्लिक करा.
- बीटा टेस्टरनंतर अपडेट आणि त्याची उपलब्धता चेक करा.
- त्यानंतर व्हॉट्सॲप अपडेट करून ओपन करा.
- अपडेट झाल्यावर नेहमीप्रमाणे तुमचे फोटोज किंवा व्हिडीओ स्टेट्सला शेअर करा आणि शेअर करताना 'एचडी' ऑप्शन निवडा.

**नोट – जर तुम्ही बीटा टेस्टर नसाल तर सध्या तुम्हाला एचडी फोटो आणि व्हिडीओ स्टेटस शेअरिंग ऑप्शनसाठी थोडी वाट पाहावी लागेल. जेव्हा हे फीचर लाइव्ह होईल, तेव्हा तुमच्या व्हॉट्सॲपमध्ये उपलब्ध होईल. यासाठी सिम्पल व्हॉट्सॲप अपडेट करावं लागेल, म्हणजे तेव्हा बीटा टेस्टर बनण्याची गरज नसेल.**

# अनशापोटी करा गुळाचे सेवन

**अनशापोटी गूळ खाल्ल्यास ४ फायदे होतात. आपल्यापैकी बहुतेक लोक रात्री जेवल्यानंतर गूळ खातात. त्यामुळे जेवण पचण्यास मदत होते. अनशापोटी गूळ खाल्ल्यावर कोमट पाणी प्यायल्यास त्याचे आरोग्यासाठी अनेक फायदे असतात.**

**रक्तदाब नियंत्रणात राहतो** : रक्तदाब नियंत्रणासाठी गूळ प्रभावी ठरतो. गुळामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शिअम आणि फॉस्फरस आढळते. हे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहेत. गुळाबरोबर आले सेवन केल्यास सांधेदुखीपासून मुक्ती मिळते.



**रक्त साफ होते** : सकाळी अनशापोटी गूळ खाऊन कोमट पाणी प्यायल्यास रक्त स्वच्छ होते. त्यामुळे नवीन रक्त तयार होते. हृदयरोग होण्याचा धोका दूर ठेवण्यासही गुळाच्या सेवनाचा फायदा होता.

**शरीराला मिळते ताकद** : गुळाच्या नियमित सेवनाने शरीर ताकदवान होते. दिवसभराचा थकवा दूर होण्यासही मदत होते. शरीरात ऊर्जा पातळी कायम राहाते आणि ती कमी होत नाही.

**पचनसंस्था मजबूत होते** : ज्या लोकांना आहार सहजपणे पचवण्यात अडचणी येतात त्यांनी गूळ आणि गरम पाणी सेवन करावे. या व्यक्तींसाठी ते औषधासारखे कामकरते. त्याचबरोबर बद्धकोष्ठता, पोटात वायू होणे, ॲसिडीटीसारख्या समस्यांपासून सुटका होण्यास मदत होते.

# 'या' चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार नाही खराब!



**घरात लग्नकार्य असलं की कामाची नुसती लगबग सुरू असते. धावपळ, धांदल असा सगळा माहोल असतो. मात्र अशा वातावरणातही एक आनंद, उत्साह असतो. लग्न म्हणजे दोन जिवांचंच नव्हे तर दोन कुटुंबांचं मीलन असतं. त्यामुळे हा दिवस घरातल्या प्रत्येकासाठी खास असतो. त्यातच वधू-वरांचा थाट तर काही औरच असतो. प्रत्येकाचं लक्ष या दोघांकडेच वेधलेलं असतं. लग्नात आलेल्या पाहूण्यांच्या नजरा, कॅमेरा हे जणू वधू-वरांकडेच केंद्रित झालेले असतात. त्यामुळे लग्नात सुंदर दिसण्यावर या दोघांचाही भर असतो. त्यातच वधू असेल तर विचारायलाच नको. अगदी साड्यांपासून मेकअपपर्यंत प्रत्येक गोष्ट खास असण्यावर तिचा भर असतो. मेकअपमुळे सौंदर्यात भर पडतेच. मात्र बऱ्याच वेळा उत्तम प्रतीच्या मेकअपचं सामान वापरूनही तो मेकअप नीट सेट होत नाही किंवा ऐनवेळी तो खराब दिसून लागतो. हे असं का होतं यामागे बरीच कारणं आहेत. यामध्ये आपल्या बदललेल्या जीवनशैलीचादेखील समावेश आहे.**

**हेअर कलर** : बदलत्या काळानुसार रोज नवनवी ट्रेंड बाजारात येत असतात. सध्या तरुणाईमध्ये हेअर कलर करण्याची क्रेझ दिसून येत आहे. त्यामुळे बऱ्याच तरुणी वेगवेगळ्या रंगांनी केस कलर करत असतात. पण काही वेळेस उत्सुक होऊन केलेला हेअर कलर त्यांचा चेहऱ्याला शोभून दिसत नाही. त्यामुळे लग्नासाठीचा लुक खराब होऊ शकतो. हेअर कलर व्यवस्थित सेटल होण्यासाठी १० ते १५ दिवस लागतात. त्यामुळे लग्नाच्या ४ ते ५ दिवस आधी हेअर कलर केल्यास जो



लूक आपल्याला अपेक्षित आहे तो मिळणार नाही. म्हणूनच लग्नापूर्वी जर केस कलर करायचे असतील तर निदान महिनाभर आधी कलर करावेत.

**हेअरकट** : हेअर कलरप्रमाणे हेअरकट देखील लग्नाच्या ४-५ दिवस आधी करू नये. कधी कधी हेअरकट आपल्याला हवा तसा होतं नाही किंवा तो ब्रायडल लूकला साजेसा नसतो. त्यामुळे लग्नात हेअरस्टाइल करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे महिनाभर आधी हेअरकट केल्यास ते चांगले ठरते.

**लग्नापूर्वी सुंदर दिसण्यासाठी केलेले उपाय** : लग्नात सुंदर दिसावं ही प्रत्येक तरुणीची इच्छा असते. त्यामुळे बऱ्याच वेळा मुली फेशिअल, ब्लिच, क्लीनअप असे नानाविध प्रकार करतात. पण लग्नाच्या ४-५ दिवसआधी ब्यूटी ट्रीटमेंट करणं नुकसानदायक ठरत. कारण काही मुलींची स्कीन सेन्सिटीव्ह असते, काहींची ड्राय तर काहींची ऑइली असते. त्यामुळे अशा त्वचेसाठी वेगवेगळ्या ब्युटी ट्रीटमेंट असतात. मात्र काही वेळा योग्य प्रोडक्ट किंवा क्रीम न वापरल्यामुळे त्याचा परिणाम चेहऱ्यावर होऊ शकतो. चेहऱ्यावर लाल पूरळ किंवा पुटकुळ्या येऊ शकतात.

**अतिरिक्त व्यायाम** : लग्नात बारीक दिसावं याकडे मुलींचा जास्त कल असतो. त्यामुळे मुली बऱ्याचदा लग्नापूर्वी डाएट, व्यायाम करतात. तसंच लग्नाच्या १०-१२ दिवस आधी हार्ड वर्कआऊट करतात. परंतु यामुळे त्या थकतात आणि सोबतच चेहरा ही अगदी फिका पडतो.

**फास्ट फूड खाणे** : लग्नात मेकअपमुळे तर आपलं सौंदर्य वाढतंच मात्र त्याचप्रमाणे चेहऱ्यावर तजेला असणंही गरजेचं आहे. तजेला असेल तरच सौंदर्यात भर पडते. नितळ आणी सतेज चेहरा हवा असेल तर आपल्या आहाराकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. या काळात फास्ट फूड खाणं कमी करावं आणि पौष्टीक पदार्थ खाण्यावर भर द्यावा. फास्ट फूड खाल्ल्यामुळे बऱ्याचदा चेहऱ्यावर पिंपल्स येण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो फास्ट फूड टाळावे.

# घसादुखीवर 'हे' झटपट घरगुती उपाय नक्की येतील कामी

**ऋतू** बदलले की शरीराच्या अनेक समस्या उद्भवतात. तसेच थंडीत अंगदुखी, पाठदुखीसोबत घसा खवखवणे, घसा दुखणे असे आजार देखील उद्भवतात. अशा वेळी आपल्याला कधी कधी गिळताना, बोलताना घशाला त्रास होतो. यालाच Throat inffection असेही म्हणतात. साधारणतः सर्दी, खोकला याप्रमाणे हा घशाला होणारा त्रास हे देखील व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते. यामुळे याच्यावर काही इलाज करु नये असेही नाही. त्या समस्येकडे लक्ष न दिल्यास घशाला सूज येणे, टॉन्सिल्स लाल होणे, त्यावर पांढरे चट्टे येणे यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अशा वेळी मग यावर त्वरित काय उपाय करता येईल अशा प्रश्न अनेकदा पडतो. म्हणूनच यावर झटपट घरगुती उपाय कोणते करता येईल ते पाहूया..



१. घशाला सूज उतरवण्यासाठी गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करता येतील.

२. घसा दुखत असल्यास तोंडात आल्याचा तुकडा ठेवल्यास थोडा आराम मिळतो.

३. आलं, टोमॅटो आणि मधाचा रस एकत्र करून घेतल्याने घसादुखीपासून आराम मिळतो.

४. मध आणि कांदा टाकून उकळलेलं पाणी गाळून ते थोड्या-थोड्या वेळाने प्यावे.

५. पाण्यात बडीशेप टाकून ते पाणी उकळून घ्यावं आणि त्यानंतर त्यात मध टाकून हे पाणी थोड्या थोड्या वेळाने प्यावे. याने घशाला आराम मिळेल.

याप्रमाणेच लिंबाचा रस आणि मध टाकलेले गरम पाणी प्यायल्यानेही घशाला आराम मिळतो. लवंग चघळल्यानेही घसादुखी कमी होते. थंडीत तुम्हाला जर तुम्हाला घसादुखीचा त्रास उद्भवत असेल तर हे उपाय नक्कीच मदत करतील.

# नाश्त्यामध्ये ब्रेड, कॉर्नफ्लेक्स खाणे शरीरासाठी हानीकारक

**सकाळच्या** नाश्त्यामध्ये अधिक जणांना ब्रेड, कॉर्नफ्लेक्स आणि अनेक तळलेले पदार्थ खाण्याची सवय असते. मात्र हे पदार्थ फुफ्फुसाच्या कॅन्सरला कारणीभूत ठरत असल्याचे नव्या संशोधनात समोर आलेय. व्हाईट ब्रेड, कॉर्नफ्लेक्स असे ग्लायसेमिक इंडेक्सयुक्त पदार्थ खाल्ल्याने फुफ्फुसाचा कॅन्सर वाढण्याची शक्यता असते. संशोधनादरम्यान ज्यांना हा आजार झाला होता अशा एक हजार ९०५ जणांना समाविष्ट केले होते. त्याचबरोबर दोन हजार ४१३ स्वस्थ व्यक्तींचेही निरीक्षण करण्यात आले. यादरम्यान त्यांच्या आहाराच्या सवयी जाणून घेतल्या. शोधकर्त्यांचे म्हणणे आहे की तंबाखू तसेच धूम्रपान न करणाऱ्या लोकांमध्येही फुफ्फुसाच्या कॅन्सरची लक्षणे आढळली. ज्यावरून त्यांच्या आहाराच्या सवयी या कॅन्सरसाठी कारणीभूत असल्याची शक्यता आहे.



# शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असेल तर या नॅचरल ड्रिंक्सने बॉडीला करा डिटॉक्स

**योग्य खानपान आणि औषधांमुळे तुम्ही शरीरात तयार होणाऱ्या युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करू शकता. युरिक ॲसिडची अधिकता शरीराला बऱ्याच प्रकारे नुकसान पोहोचवते. आम्ही तुम्हाला अशा काही नॅचरल ड्रिंक्सबद्दल सांगत आहोत ज्याचे सेवन केल्याने शरीरातील युरिक ॲसिडचे स्तर कमी होतील आणि तुम्हाला त्याचा योग्य फायदा देखील मिळेल.**



**नारळपाणी**

युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करण्याचा सर्वात उत्तम उपाय पाणी आहे. पाण्याशिवाय नारळपाणी देखील युरिक ॲसिडला नियंत्रित करतो. हे युरिक ॲसिडला पातळ करून किडनीला उत्तेजित करतात ज्यामुळे शरीरातून युरिक ॲसिड मूत्राच्या माध्यमाने बाहेर निघून जाते.

**मोसंबी आणि पुदिना**

या ड्रिंकमध्ये पर्याप्त मात्रेत व्हिटॅमिन असतात, जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करण्यास मदत करतात. याचे सेवन करण्यासाठी मोसंबीचे साल काढून त्याच्या बारीक बारीक फोडी करून त्यात लिंबाचा रस आणि पुदिन्याचे पान घालावे व या मिश्रणाला मिक्सरमधून फिरवून त्याचा ज्यूस काढावा व त्याचे सेवन करावे.

**ब्लॅक चेरी आणि चेरी**

ब्लॅक चेरी आणि चेरीचा ज्यूस युरिक ॲसिडमुळे होणारे संधिवात किंवा किडनी स्टोनच्या समस्येसाठी योग्य आहे. ब्लॅक चेरी युरिक ॲसिडच्या सीरम स्तराला कमी करून संधिवात आणि किडनीहून क्रिस्टल दूर करण्यास मदत करते. यात अँटीऑक्सिडेंट आणि अँटी इंफ्लेमेंटरी गुणदेखील असतात, जे युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतात.

**खिऱ्याचे सूप**

खिऱ्याचे सूप शरीराला हायड्रेड ठेवण्यासोबत युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करतो. याचे सेवन करण्यासाठी एका भांड्यात खिऱ्याचा ज्यूस, पाव कप योगर्ट, पुदिन्याचे पान आणि लिंबाचा रस घालून मिक्सरमधून फिरवून घ्या आणि थोड्या वेळाने गार झाल्यावर त्याचे सेवन करा.

**सेबचा सिरका**

सेबचा सिरका शरीरातून युरिक ॲसिडला दूर करण्यास मदत करतो. अँटीऑक्सिडेंट आणि एंटीइंफ्लेमेंटरी गुणांमुळे हे शरीरात क्षारीय ॲसिड संतुलन बनवून ठेवतो. हा सिरका रक्ताच्या पीएच वॉल्यूमला वाढवून युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतो.

**अननसाचा ज्यूस**

या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर अँटीऑक्सिडेंट असतात जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करून शरीरातून बाहेर काढण्यात मदत करतात. याचे सेवन केल्याने शरीराला दुसरे इतर फायदेदेखील मिळतात.

# हिंदीसक्तीचे साईड इफेक्ट्स... यूपी, बिहारमधील २०,००० शिक्षकांना महाराष्ट्रात नोकरी?

**■ठाणे :** राज्य सरकारने पहिलीपासून त्रिभाषा सूत्रावरुन पूर्णपणे माघार घेतलेली नाही. त्रिभाषा सूत्राच्या माध्यमातून हिंदी सक्तीसंदभार्तील शासन आदेश सरकारने सध्या मागे घेतला असला तरी यासंदबार्तील विचारासाठी समिती नेमली आहे. भविष्यात त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबत या समितीने सकारात्मक अहवाल दिल्यास राज्यात मोठी शिक्षक भरती होण्याची शक्यता आहे. मात्र राज्यभरातील शाळांमध्ये जवळपास वीस हजारांहून अधिक परप्रांतीय शिक्षकांना नोकऱ्या मिळतील अशी शक्यताही व्यक्त केली जातेय.



### राज्य सरकारकडून समितीची स्थापना

त्रिभाषा सूत्राची पहिलीपासून सक्ती करण्याच्या निर्णयावरुन राज्य सरकारविरोधात सर्व विरोधी पक्ष एकवटले आहेत. साहित्यिक, मराठी भाषा परिषद, विविध संस्था आणि मान्यवरांनीही त्रिभाषा सूत्राची पहिलीपासून सक्तीचा तीव्र विरोध केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्रिभाषा सक्तीचे दोन्ही शासननिर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतला. माजी कुलगुरू व शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने आता नवीन समिती नेमली असून त्रिभाषा सूत्र पहिलीपासून लागू करायचे की नाही, याचा अहवाल तीन महिन्यांत देण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### राष्ट्रीय धोरणामध्येच तशी तरतूद

राष्ट्रीय शिक्षण धोरणातच राज्यात हिंदी भाषा शिकविणारे बीएड पदविकाधारक शिक्षक उपलब्ध न झाल्यास अन्य राज्यांमधील शिक्षकांच्या नेमणूका करण्याची मुभा देण्यात आली आहे. इतकेच नाही तर परप्रांतीय हिंदी शिक्षकांच्या नियुक्त्या करण्याचं ठरलं तरी राज्य सरकारला त्यांच्यासाठी डोमिसाईल सर्टिफिकेटच्या सक्तीच्या नियमाला बगल द्यावी लागेल. राज्यात त्रिभाषा सूत्राची पहिलीपासून सक्ती करण्यात आल्याने हिंदीविरोधात वाद पेटलेला असतानाच ही बातमी समोर येत आहे.

### राज्यात कमी मनुष्यबळ ?

शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात बीएड अभ्यासक्रमाच्या साधारण ३५ हजार जागा आहेत. दरवर्षी त्यातील साधारण साडेतीन ते चार हजार विद्यार्थी हिंदी विषय निवडतात. राज्यातीलच शिक्षक नेमावयाचे असल्यास अन्य विषय घेऊन बीएड झालेल्या शिक्षकांना हिंदी शिकविण्याचे काम द्यावे लागेल. मात्र नियमानुसार तसे करता येणार नाही.

### हिंदी भाषिक राज्यांमधील शिक्षकांना प्राधान्य द्यावं लागणार?

उत्तर प्रदेश, छत्तीसगढ, मध्य प्रदेश, बिहार आदी हिंदी भाषक राज्यांमध्ये हिंदी विषय घेऊन बीएड होणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण मोठे आहे. तिसरी भाषा किंवा पयार्यी भाषा शिकविण्यासाठी शिक्षक उपलब्ध नसल्यास ते अन्य राज्यांतील शिक्षकांची नेमणूक करता येईल, अशी शिफारस राष्ट्रीय शिक्षक धोरणातच करण्यात आली आहे. त्यामुळे हिंदी घेऊन बीएड झालेले शिक्षक राज्यभरातील शाळांमध्ये नेमावयाचे झाल्यास ३० ते ३५ हजार परप्रांतीय शिक्षकांच्या नियुक्त्या कराव्या लागतील.

### डोमिसाईल सर्टिफिकेटची अट घालता येणार नाही?

स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य शासन व अनुदानित शाळांमध्ये हिंदी शिक्षकांच्या नियुक्त्या करावयाच्या झाल्यास त्यांच्याकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल सर्टिफिकेट) असणे बंधनकारक आहे. मात्र ते नसल्यास नियुक्ती करताना त्याबाबतची अटही शिथिल करावी लागेल, असे उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितल्याचं एका नामांकित वृत्तपत्रानं म्हटलं आहे. या समितीने डॉ. माशेलकर समितीचा अहवाल योग्य ठरविल्यास पुढील वर्षीच्या शैक्षणिक वषार्पासून त्रिभाषा सूत्र म्हणजे बहुतेक शाळांमध्ये हिंदी भाषेची सक्ती लागू होण्याची शक्यता आहे.

### राज्यातील शिक्षकांची आकडेवारी काय सांगते?

मात्र हिंदी भाषेची सक्ती झाल्यास अंमलबजावणी आणि ती शिकविण्यासाठी मान्यताप्राप्त पदवीधारक शिक्षक मिळणे अवघड होणार आहे. शासकीय आकडेवारीनुसार राज्यात सुमारे ४९ हजार प्राथमिक शाळा (पहिली ते पाचवी) आहेत. त्यातील ४ हजार खासगी विनाअनुदानित आहेत. मात्र बाकीच्या शासकीय किंवा अनुदानित आहेत. या शाळांमध्ये त्रिभाषा सूत्र आणि त्यात हिंदी हा तुलनेने प्रशासकीयदृष्ट्या सोपा पर्याय लागू करायचा झाल्यास त्या तुलनेत शिक्षक उपलब्ध करून द्यावे लागतील. पुढील शैक्षणिक वषार्पासून हिंदी भाषा पहिलीपासून शिकवायची असल्यास किमान ३० ते ४० हजार हिंदी व बीएड पदवीधारक शिक्षक उपलब्ध करून द्यावे लागतील.



## हिंदी सक्तीचं राहुद्या... आधी हे बघा! राज्यातील ८००० गावं शाळांविनाच

मिझोरम, केरळ यांसारख्या राज्यांच्या साक्षरतेचा आकडा पाहिल्यानंतर त्यांच्या आकड्यात आणि महाराष्ट्रातील साक्षरतेच्या आकड्यात असणारी तफावत स्पष्टपणे दिसून येते. मुळात ही दरी अनेक कारणांमुळं असून त्यातलंच एक कारण म्हणजे राज्यात अद्यापही अनेक ठिकाणी शाळाच पोहोचू शकलेल्या नाहीत. अधिकृत आकडेवारी समोर आल्यामुळं हे धक्कादायक वास्तव पाहता राज्यातील 'शिक्षणाची पाटी फुटली' असंच म्हणायला लागत आहे.

### राज्यात आठ हजार गावं शाळांविनाच

शिक्षणच मानवाला सर्वस्वी एक चांगली व्यक्ती म्हणून घडवत असतं हे कितीही खरं असलं तरीही राज्यात मात्र सध्या हिंदी भाषेची सक्ती आणि तत्सम मुद्देच चर्चेत असून त्यांचा पाया असणारं शिक्षणच कुठेतरी कमी पडत आहे असं म्हणायला हरकत नाही. समग्र शिक्षण अभियानाचा अर्थसंकल्प ठरवण्यासाठी नुकतीच राज्यासह केंद्र शासनाच्या शिक्षण विभागाची संयुक्त बैठक पार पडली. बैठकीतील 'युडायस'च्या आकडेवारीनुसार सध्यच्या घडीला राज्यात ८ हजार १२३ गावांमध्ये शाळांची सुविधा नसून, खुद्द राज्याच्या शिक्षण विभागाने विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ही बाब मान्य केली आहे. पारनेरचे आमदार काशीनाथ दाते यांच्यासह इतर काही सदस्यांनी विधानसभेत यासंदर्भातील तारांकिच प्रश्न उपस्थित केला होता. ज्यातून ही माहिती समोर आली. सदर माहितीनुसार १६५० गावांमध्ये प्राथमिक शाळा आणि ६५६३ गावांमध्ये उच्च प्राथमिक शाळा नसल्याचं लक्षात आलं आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला असता राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी त्याबाबतचं लेखी उत्तर दिलं. उत्तरात भुसे यांनी ही बाब आणि आकडेवारी अंशतः खरी असल्याचं नमूद केलं. इतकंच नव्हे, तर राज्यातील 5373 शाळांमध्ये वीज, ५३० शाळांमध्ये पिण्याचं पाणी, ३३३५ शाळांमध्ये मुलींसाठी तर ५१२४ शाळांमध्ये मुलांसाठी स्वतंत्र शौचालय नसल्याचं निदर्शनास आल्याबाबता प्रश्नही उपस्थित केला असता त्यावरही हे अंशतः सत्य असल्याचं उत्तर शिक्षण विभागानं दिलं. ज्यामुळं हिंदी भाषेच्या सक्तीऐवजी आणि त्रिभाषा सूत्रावरून सुरू असणाऱ्या एकंदर वादंगाऐवजी शासनानं या प्राथमिक गोष्टींकडे लक्ष केंद्रीत करावं अशीच मागणी आता जनसामान्यांकडूनही केली जात आहे.

### शाळेचं छत उडालं...

राज्यभर मराठी आणि हिंदी भाषेवरून रणकंदन सुरू असताना ग्रामीण भागातील मराठी शाळांचं दाहक वास्तव आता समोर येऊ लागलं आहे. जिथं, चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्यातल्या सोनापूर शाळेचं छत उडून दोन महिने उलटले, मात्र जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने दुर्लक्ष केल्याने चिमुकले विद्यार्थी खुल्या रंगमंचावर शिक्षण घेत आहेत. सदर प्रकरणी कोणतीही समाधानकारक कारवाई होत नसल्यानं शाळा समिती आणि पालकांनी संताप व्यक्त केला आहे.

# मीरा-भाईंदर मेट्रो कारशेडविरोधात आंदोलन

**नैसर्गिक ऑक्सिजनचा स्रोत वाचवण्यासाठी लढा, ६ हजारांहून अधिक नागरिक सहभागी**



### २१ ठिकाणी एकत्रित आंदोलन

डोंगरी कारशेडविरोधातील लढा आता फक्त भाईंदरपुरता मर्यादित न राहता मुंबई व उपनगरांतील २१ ठिकाणी आंदोलन करण्यात आले. त्यामुळे या विषयावर जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आंदोलनकर्त्यांनी शासनाकडे मागणी केली की, उपलब्ध मोकळ्या जागांमध्येच कारशेड हलवावे, अन्यथा स्थानिकांवर कारवाई लादल्यास तीव्र आंदोलन उभारले जाईल.

**■भाईंदर :** मीरा-भाईंदर परिसरातील डोंगरी येथे प्रस्तावित मेट्रो कारशेड प्रकल्पाच्या विरोधात रविवारी सुमारे ६ हजारांहून अधिक नागरिकांनी मानवी साखळी आंदोलन करून तीव्र निषेध व्यक्त केला. या कारशेड प्रकल्पामुळे नैसर्गिक ऑक्सिजनचा स्रोत, जैवविविधता, पर्यावरण, हजारो पक्षी व प्राण्यांचा निवारा तसेच स्थानिकांची शेती व बागायती नष्ट होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी कारशेड लादल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

मीरा-भाईंदर मेट्रो ९ आणि मेट्रो ७ए साठी सुभाषचंद्र बोस मेट्रो स्थानकाजवळ मोकळी जागा असतानाही सुमारे ७-८ किमी दूर असलेल्या डोंगरी डोंगरावर कारशेड उभारण्याचा निर्णय एमएमआरडीए आणि शासनाने घेतला आहे. या डोंगरावरील १२,४०० झाडांची कत्तल केली जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले असूनही प्रत्यक्षात मात्र ही संख्या १५ ते १८ हजार असल्याचा स्थानिकांचा दावा आहे. झाडांचे वय आणि संख्या कमी दाखवून वृक्षतोड सुरू केल्याचा आरोपही स्थानिकांनी केला आहे.

या डोंगरात असलेली नैसर्गिक झरे, धबधबे, औषधी वनस्पती, विविध पक्षी व प्राणी प्रजाती, तसेच ग्रामस्थांनी उभारलेली धरणे व शेती हे देखील नष्ट केली जाणार आहे. हा संपूर्ण परिसर मीरा-भाईंदर शहरासाठी महत्त्वाचा ऑक्सिजन झोन असून, पर्यावरणाचे संतुलन राखणारा भाग आहे. मात्र डोंगरावर स्फोटकांच्या सहाय्याने खोदकाम आणि हजारो झाडांची कत्तल करून कारशेड उभारल्यास स्थानिक भूमिपुत्र, शेतकरी व पर्यावरण यावर विनाशकारी परिणाम होणार आहे.

या परिसरात यापूर्वीच महापालिकेने धावगी डोंगरावर बेकायदेशीर कचरा डम्पिंग केल्याने मोठ्या प्रमाणावर प्रदूषण, दुर्गंधी व शेतीची हानी झाली आहे. कारशेड प्रकल्पामुळे उरलेले निसर्गसंपन्न डोंगर नष्ट झाल्यास, नागरिकांचे जीवन अधिक असह्य होईल, असा आरोप नागरिकांनी केला आहे.

१५ ते २० हेक्टर जागा देखील कारशेडसाठी पुष्कळ असताना डोंगरी येथे तब्बल ७० हेक्टर जागा कारशेडच्या आड घेतली आहे. विधानभवनात २०२२ च्या अधिवेशनात नगरविकास मंत्री यांनी लिहून दिले होते की, डोंगरी परिसर तांत्रिकदृष्ट्या कारशेडसाठी अयोग्य आहे. तरीही सरकारने ७० हेक्टर निसर्गसंपन्न डोंगराळ परिसर कारशेडसाठी निवडल्याने जाणीवपूर्वक ही जागा निवडल्याबाबात प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे.

### शांततापूर्ण आंदोलन

रविवार, ६ जुलै रोजी सकाळी ९.१५ ते ११.१५ या वेळेत डोंगरी दत्त मंदिर ते चौक गावपर्यंत मानवी साखळी तयार करण्यात आली. नागरिक, मच्छिमार, शेतकरी, विविध संस्था, पक्षांचे प्रतिनिधी, विद्यार्थी, महिलांनी काळे झेंडे, निषेध फलक घेऊन शांततापूर्ण आंदोलनात भाग घेतला. 'झाडे वाचवा, डोंगर वाचवा, कारशेड थांबवा' असे संदेश देणारे फलक आणि प्रतीकात्मक कृतीही (जसे काचेच्या बरणीत झाड ठेवून ऑक्सिजन मिळवण्याचा संदेश) लोकांचे लक्ष वेधत होते. शहीद मेजर कौस्तुभ राणे यांच्या मातोश्री ज्योती राणे, तसेच विविध धर्मगुरू, सामाजिक कार्यकर्ते, वकील, डॉक्टर, पत्रकारांनी आंदोलनात भाग घेतला.

# वीज चोरी करणाऱ्यावर कारवाईसाठी गेलेल्या ठेकेदाराला मारहाण

**■भाईंदर :** मिरा-भाईंदर महापालिकेला एमएमआरडीएने ताब्यात दिलेल्या मिरारोड येथील पिनाकोला रेंटल या इमारतीमध्ये चोरुन विजेचा वापर करणार्यावर टाटा पावर कंपनीचे कर्मचारी व सोबत असलेल्या महापालिका ठेकेदाराचे कर्मचारी कारवाई करण्यासाठी गेले होते. यावेळी वीज जोडणी बंद करत असताना एका व्यक्ती सह इतरांनी मिळून ठेकेदाराला मारहाण केल्याची शनिवारी घटना घडली आहे. याप्रकरणी ६ जणांच्या विरोधात मिरारोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या इमारतीचे काम देखभाल दुरुस्तीचे काम इंद्रजित विश्वकर्मा यांना देण्यात आले आहे, या इमारतींमध्ये चोरुन विज वापरत असल्याचे महापालिका कनिष्ठ अभियंत्याच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी ठेकेदाराला तपासणी करण्याचे सांगितले होते. त्यानंतर त्यांचा विजेचा प्रवाह बंद करायचा असल्याचे सांगितले.



तपासणी करण्यासाठी मनपा अभियंता, ठेकेदार, टाटा पावर कर्मचारी यांनी मीटर केबीनमध्ये जावून पाहणी केली असता इमारतीमधील काही लोकांनी इमारतीच्या सामाईक मीटरमधून चुकीच्या पद्धतीने वीज घेतली असल्याचे लक्षात आले. त्यानंतर मनपा कनिष्ठ अभियंत्यांनी टाटा पॉवरच्या कर्मचार्यांना बोलावून त्या इमारतीमधील अनधिकृत जोडणी असलेली वायर कापण्यास सुरूवात केली. ते १३ व्या माळ्यावर आले असता रुम नं. १३१३ मध्ये तपासणी करण्यासाठी जात असता त्या रुमची विद्युत जोडणी मिटर रुममधून तोडण्यात आलेली आहे. तरी देखिल त्या रुम मध्ये लाईट असल्याचे निदर्शनास आले.

त्यामुळे त्यामध्ये राहर्णाया व्यक्तीला त्याबाबत विचारले असता, माज्या रुमकडे यायचे नाही मला संदिप यादव याने मला कनेक्शन दिले आहे, तुम्हाला काय करायचे ते करा. त्यानंतर ते दुर्सया रुममध्ये कारवाई करण्यासाठी निघून गेले. १० मिनिटानंतर रुम नं. १३१३ मधील व्यक्ती इतर ५ अनोळखी लोकांना घेऊन तिथे आला आणि इंद्रजित विश्वकर्मा यांना लाथा बुक्क्याने मारहाण केली. त्यावेळी सोसायटीमधील लोकांनी त्याला त्यांच्यापासून वाचवले. त्यानंतर इंद्रजित विश्वकर्मा यांना मारहाण केल्याप्रकरणी मिरारोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक मेघना बुरांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर पडवळ हे करत आहेत.

### पालिका अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप

मिरा- भाईंदर शहरातील बीएसयुपी या योजनेतील आणि रस्त्यामध्ये बाधित झालेल्या रहिवाशांना एमएमआरडीएच्या म्हाडाच्या पिनाकोला या इमारतीमध्ये राहण्यासाठी घरे दिली आहेत. महापालिकेकडून या इमारतीची देखभाल व दुरुस्ती केली जाते. या इमारतींमध्ये ज्या रहिवाशांना घरे देण्यात आली आहेत, त्यांनी स्वतः राहणे आवश्यक आहे. तसेच भाड्याने देणे सुद्धा बेकायदा आहे. परंतु, फ्लॅट मालकांच्या सहकार्याने अनेकांनी घरे भाड्याने दिली आहेत. अनेक भाडेकरू हे परप्रांतीय आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहेत. या पुर्वी देखील त्या इमारतीत अनेक गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना घडल्या आहेत. काही दिवसांपूर्वी त्या इमारतींमध्ये एका तरुणीची हत्या देखील करण्यात आली होती. याकडे महापालिका अधिकारी दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे या इमारतींमध्ये राहर्णाया नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे,अशा तक्रारी आहे.

# येऊरमधील अनधिकृत बांधकामाचे सर्वेक्षण

**आयुक्तांचे निर्देश, अनधिकृत व्यावसायिक बांधकामांवर होणार कारवाई**

**■ठाणे :** संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगत येऊरच्या पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात सुरू असलेल्या सर्व अनधिकृत अनिवासी, व्यावसायिक बांधकामाचे महिनाभरात सर्वेक्षण करण्याचे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

येऊरमध्ये अनधिकृत व्यावसायिक बांधकामे आहेत. तेथे जेवणावळी, विवाह, पार्टी आदी समारंभ होतात. अपरात्रीपर्यंत मोठ्या आवाजात, ध्वनिवर्धक, बँड, फटाके वाजवले जातात. या सर्व गोष्टी पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात प्रतिबंधित आहेत. त्यामुळे त्या सर्व गोष्टी तातडीने थांबण्याचा निर्णय ठाणे महापालिकेने घेतला आहे. त्यासाठी, सर्वप्रथम तेथील अनधिकृत अनिवासी व्यावसायिक बांधकामाचे सर्वेक्षण महापालिका करणार असल्याचे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले आहे.



### टर्फवरील कारवाईचा घेतला आढावा

येऊर येथील १० अनधिकृत टर्फपैकी ०८ टर्फवर कारवाई झाली आहे. दोन टर्फ मालकांनी १० जुलैपर्यंत स्वतःहून टर्फ काढण्याचे मान्य केले आहे. त्यांनी ते न काढल्यास महापालिका त्यावरही कारवाई करणार आहे. या टर्फशिवाय आणखी २ अनधिकृत टर्फची माहिती याचिकाकर्ते रोहित जोशी यांनी या बैठकीत दिली. त्यापैकी एकावर महापालिकेने अनधिकृत बांधकामाच्या विरोधातील विशेष मोहिमेत कारवाई केली आहे, तर दुसऱ्या टर्फवर तत्काळ कारवाईचे आदेश आयुक्त राव यांनी दिले.

ठाणे महापालिका क्षेत्रातील ना विकास क्षेत्र, हरित क्षेत्र येथील अनधिकृत बांधकामांबाबत उच्च न्यायालय यांनी दिलेले निर्देश, तसेच राज्य सरकारने मार्च २०२५ मध्ये काढलेले परिपत्रक यात अनधिकृत बांधकामाबद्दल करावयाच्या कारवाईबाबत मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. त्यानुसार महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई यापूर्वीच सुरू झाली आहे.

शहर विकास विभागाने येऊर येथे निवासी बांधकामांसाठी परवानगी दिली आहे. या बांधकामाचा वापर व्यावसायिक कारणासाठी होतो का, याचीही पाहणी या सर्वेक्षणात करण्यात येणार आहे. सर्व अनधिकृत व्यावसायिक आस्थापना बंद करण्याच्या नोटिसा पाठविण्याचे निर्देशही आयुक्त राव यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिले आहेत. येऊरमध्ये महापालिका, वनविभाग आणि पोलीस यांची संयुक्त कारवाई करण्यात येणार आहे.

# जाहिरातदारांना लेखापरीक्षण अहवाल सादर करण्याच्या सूचना

**■वसई :** पावसाळ्यात वादळी वाऱ्यात जाहिरात फलक कोसळण्याच्या घटना घडतात. अशा घटनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी पालिकेच्या जाहिरात विभागाकडून जाहिरातदारांना लेखापरीक्षण अहवाल सादर करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. जे अहवाल सादर करीत नाहीत किंवा जे जाहिरात फलक धोकादायक व विनापरवाना आहेत त्या विरोधात ही कारवाई सुरू केली आहे. आतापर्यंत शंभर हून अधिक जाहिरात फलकांवर कारवाई केली आहे. तर ३० गुन्हे दाखल केले आहेत. वसई-विरार शहरात सध्या मोठ्या प्रमाणावर रस्त्याच्या कडेला, इमारतींवर आणि खासगी जागेत लहान मोठे जाहिरात फलक लावण्यात आले आहेत. या जाहिरात करातून पालिकेला उत्पन्न मिळते.



### बेकायदा जाहिरात फलक लावर्णायावर गुन्हे

वसई- विरार शहरात नियमबाह्य पध्दतीने जाहिरात फलक लावण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. या प्रकारामुळे शहराचे विद्रुपीकरण होत असून अपघात होण्याची शक्यता आहे. असे असतानाही शहरात विविध ठिकाणी अनधिकृत व धोकादायक पद्धतीने जाहिरात फलक उभे केले जात आहेत. मुख्य रस्ते, वळणाचे रस्ते, चौकात जाहिरात फलक लावताना कोणतीच काळजी घेतली जात त्यावर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया ही केली जात आहे.

जाहिरातदारांनी अर्ज केल्यानंतर सर्व पाहणी करूनच त्यांना फलक लावण्याची परवानगी दिली जाते.

यंदाच्या चालू वर्षात सातशेहून अधिक जाहिरात फलकांना परवानगी दिली आहे. विशेषतः पावसाळ्यात सुटत असलेल्या वादळी वार्यात जाहिरात फलक कोसळण्याच्या घटना समोर येत असतात.अशा घटनांमुळे जिवीतहानी होण्याची शक्यता असते. अशा घटना टाळण्यासाठी महापालिकेने शहरातील जाहीरात दारांना लावण्यात येत असलेल्या जाहिरात फलकांचे संरचनात्मक लेखापरीक्षण करण्याच्या संदर्भात नोटिसा देऊन त्यांना तसा अहवाल सादर करण्यास सांगण्यात येत आहे.तसेच जे जाहिरातदार अहवाल सादर करणार नाहीत त्यांच्यावर कारवाई केली जाईल असा इशारा महापालिकेच्या जाहिरात विभागाने दिला आहे.

# तुर्भे ट्रक टर्मिनलमध्ये भीषण आग... ७ ट्रकसह जेसीबी जळून खाक, जीवितहानी नाही

**■नवी मुंबई :** तुर्भे येथील ट्रक टर्मिनलमध्ये रविवारी रात्री साडेअकरा - पावणेबाराच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीवर पहाटेपर्यंत नियंत्रण मिळवले असले तरी सोमवारी दुपारपर्यंत कुलिंगचे काम सुरू होते. या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले असून एकूण ७ ट्रक आणि १ जेसीबी वाहन पूर्णतः जळून खाक झाले आहेत. या आगीमुळे एपीएमसीतील आगरोधक यंत्रणा किती कुचकामी आहे हे पुन्हा समोर आले आहे.



नवी मुंबईतील एपीएमसी मार्केट नजीक तुर्भे सेक्टर २० येथे राज्य परिवहन मंडळाच्या भूखंडावर ट्रक टर्मिनल आहे. या ठिकाणी एपीएमसीला येणाऱ्या गाड्या मुक्कामी थांबत असतात. अशा गाड्यांतील माल उतरवून ठेवण्यासाठी तेथे एक गोडाऊन स्वरूपात माल ठेवण्यात येतो. याच गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा माल ठेवण्यात आला होता. या गोडाऊनमध्ये रात्री साडेअकराच्या सुमारास आग लागल्याची माहिती वाशी अग्निशमन दलाला मिळाली होती. तुर्भे एमआयडीसी, नेरूळ एमआयडीसी, कोपरखैरणे, वाशी, नेरूळ अशा ठिकाणच्या अग्निशमन गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या होत्या. आगीत प्लास्टिक असल्याने आग विझवली तरी एखाद्या ठिणगीने पुन्हा आग पकडत होती. या परिस्थितीतून आगीवर पहाटे पर्यंत नियंत्रण मिळवण्यात आले. आगीत गोडाऊन मधील माल जळून गेला आहे. आज दुपार पर्यंत कुलिंगचे काम सुरु होते, अशी माहिती अग्निशमन दलाने दिली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com